जिल्ह्यातील निकडीच्या प्रश्नांना वाचा फोडणारे एकमेव दैनिक
संस्थापक कै. आचार्य गुंदेचा
नवा मराठा
फोन–२४१४१४१, २४१७७७७
भाडोत्री म्हणून वर्षानुवर्ष जगण्यापेक्षा निर्भिड म्हणून क्षणभर जगण्यात जीवनाचे खरे सार्थक आहे. – कै.आचार्य गुंदेचा
email - navamaratha@gmail.com

# अवैध हुक्का पार्लरवर पोलिसांचा छापा, तंबाखूजन्य पदार्थ जप्त

## दोघांविरुद्ध गुन्हा दाखल

नगर – शहरातील सावेडी उपनगरात अवैध रित्या सुरू असलेल्या हुक्का पार्लरवर पोलिसांनी धाड टाकून मोठी कारवाई केली आहे. सोनानगर चौक परिसरातील बारस्कर मळा येथील एका पत्र्याच्या शेडमध्ये हा प्रकार सुरू होता. या कारवाईत पोलिसांनी हुक्का पिण्यासाठी वापरले जाणारे साहित्य आणि तंबाखूजन्य पदार्थ जप्त केले असून दोन जणांविरुद्ध गुन्हा दाखल केला आहे. उपविभागीय पोलीस अधिकारी कार्यालयाचे पोलीस नाईक हेमंत जबाजी खंडागळे यांनी याप्रकरणी फिर्याद दिली आहे. पोलिसांनी दिलेल्या माहितीनुसार, आदिराज विलास दोमल (रा. बालिकाश्रम रोड, अहिल्यानगर) हा या हुक्का पार्लरचा मालक असून, तो बेकायदेशीरपणे हे केंद्र चालवत होता. छाप्यात मोहम्मद सत्तार अन्सारी (रा. रांची, झारखंड) हा तरुण हुक्का पिताना रंगेहात मिळून आला. पोलिसांनी घटनास्थळावरून काचेचे पॉट, चिलीम, हुक्का पाईप, चिमटा आणि विविध कंपन्यांचे तंबाखूजन्य फ्लेवर्स असा एकूण ४ हजार २०० रुपयांचा मुद्देमाल जप्त केला आहे. याप्रकरणी तोफखाना पोलीस ठाण्यात सिगारेट व अन्य तंबाखूजन्य उत्पादने अधिनियमानुसार गुन्हा नोंदवण्यात आला आहे.

# शासकीय कर्मचाऱ्यांनी केले 'जागरण गोंधळ' आंदोलन

### प्रलंबित मागण्या मान्य करण्याची मागणी; संबळ, ढोलकीच्या गजरात शासनविरोधी घोषणाबाजी



विविध प्रलंबित मागण्यांसाठी शासकीय, निमशासकी कर्मचाऱ्यांनी राज्यव्यापी संप पुकारला आहे. या संपाचा एक भाग म्हणून अहिल्यानगर जिल्हाधिकारी कार्यालयासमोर जागरण गोंधळ घालून शासनविरोधी जोरदार घोषणाबाजी करण्यात आली.

नगर – राज्यातील सरकारी, निमसरकारी कर्मचारी, शिक्षक व शिक्षकेतर कर्मचारी आपल्या विविध प्रलंबित मागण्यांसाठी संपावर असून, या संपाच्या तिसऱ्या दिवशी २३ एप्रिल रोजी अहिल्यानगर जिल्हा राज्य सरकारी, निमसरकारी कर्मचारी, मुख्याध्यापक व शिक्षक संघटना समन्वय समितीच्या वतीने जिल्हाधिकारी कार्यालयासमोर जागरण गोंधळ आंदोलन करण्यात आले. या आंदोलनाद्वारे शासनाने तातडीने प्रलंबित प्रश्नांवर तोडगा काढावा, अन्यथा संप अधिक तीव्र करण्याचा इशारा देण्यात आला.

गुरुवारी सकाळपासूनच जिल्हाधिकारी कार्यालय परिसर संबळ, ढोलकीच्या गजराने दणाणून गेला होता. गोंधळी मंडळींनी पारंपरिक पद्धतीने जागरण करत आंदोलनाला वेगळा रंग दिला. गोंधळाला या... गोंधळाला या... अशा गीतांसह आंदोलकांनी जोरदार घोषणाबाजी करत शासनाचे लक्ष वेधण्याचा प्रयत्न केला.

या आंदोलनात समन्वय समितीचे निमंत्रक रावसाहेब निमसे, सरकारी कर्मचारी संघटनेचे अध्यक्ष सुभाष तळेकर, विलास पेद्राम, वंदना नेटके, विजय काकडे, भागवत नवगण, अशोक मासाळ, शंकर जगताप, भाऊ शिंदे, वैशाली बोडखे, पुरुषोत्तम आडेप, विलास पेद्राम, संदिपान कासार, माध्यमिक शिक्षक सोसायटीचे चेअरमन आप्पासाहेब शिंदे, मुख्याध्यापक संघाचे अध्यक्ष प्रा. सुनिल पंडित, माध्यमिक शिक्षक संघाचे जिल्हाध्यक्ष सचिन झगडे, शिक्षकेतर संघटनेचे संदीप पानमळकर, महानगर माध्यमिक शिक्षक संघाचे शहराध्यक्ष उद्धव गुंड, जीएसटी विभागाच्या वर्षा पारधी, दिपक चन्ने, प्रसाद सामलेटी, उषा पारधी, आप्पासाहेब जगताप, प्रसाद साठे, संतोष कार्ले, अमोल ठाणगे, सुधीर लाड, प्रमोद सूर्यवंशी, दिगंबर कर्पे, प्रमोद जोशी, शंकर जगताप, दुर्गा हरेल, कविता लोखंडे, शुभांगी खरात, अश्विनी खरपुडे, गंगासागर उगले, अनिता पवार, अमोल ठाणगे, बाळासाहेब निवडुंगे, भगवान सानप, सुषमा उमाप, सौ. सुतार, श्रीमती ज्योती दांगट, राहुल कोळेकर, नाड भाऊसाहेब आदींसह सहभागी झाले होते.

आंदोलनकर्त्यांनी स्पष्ट केले की, विविध प्रलंबित मागण्यांकडे शासनाचे वारंवार लक्ष वेधूनही त्यावर कोणतीही ठोस कार्यवाही होत नसल्यामुळे हा संप पुकारण्यात आला आहे. प्रमुख मागण्यांमध्ये जुनी पेन्शन योजना लागू करणे, निवृत्तीचे वय ६० वर्षे करणे, रिक्त पदे तात्काळ भरणे, कंत्राटी कर्मचाऱ्यांना कायम करणे, चतुर्थश्रेणी व वाहनचालक भरतीवरील बंदी उठवणे, सर्व कर्मचाऱ्यांसाठी कॅशलेस आरोग्य विमा योजना लागू करणे यांचा समावेश आहे. तसेच केरळ राज्याच्या धर्तीवर ५ लाख रुपयांपर्यंत कॅशलेस आरोग्य विमा योजना महाराष्ट्रात लागू करावी, अशा एकूण १८ मागण्या शासनाकडे करण्यात आल्या आहेत.

दरम्यान, या संपामुळे जिल्हाधिकारी कार्यालयातील बहुतांश कामकाज ठप्प झाले असून, निवडणूक कामकाज वगळता इतर सर्व विभागांवर परिणाम झाला आहे. अनेक शाळांमधील शिक्षक संपात सहभागी झाल्यामुळे शैक्षणिक कामकाजावरही मोठा परिणाम जाणवत आहे. सरकारने तातडीने सकारात्मक भूमिका घेऊन मागण्यांवर निर्णय घ्यावा, अन्यथा आंदोलन आणखी तीव्र करण्यात येईल, असा इशारा समन्वय समितीच्या वतीने देण्यात आला आहे.

# बेमुदत संपाला हिवताप कर्मचाऱ्यांचा पाठिंबा

### शासनाने तातडीने निर्णय घ्यावा, अन्यथा आंदोलन वाढवण्याचा इशारा



नगर – राज्यातील सरकारी, निमसरकारी तसेच शिक्षक–शिक्षकेतर कर्मचाऱ्यांच्या समन्वय समितीच्या नेतृत्वाखाली सुमारे १७ लाख कर्मचाऱ्यांनी विविध मागण्यांसाठी २१ एप्रिल पासून बेमुदत संप पुकारला आहे. या संपाला महाराष्ट्र राज्य हिवताप निर्मूलन कर्मचारी मध्यवर्ती संघटनेच्यावतीने पाठिंबा देण्यात आला आहे.

महाराष्ट्र राज्य हिवताप निर्मूलन कर्मचारी मध्यवर्ती संघटना ही शासनमान्य राज्य सरकारी कर्मचारी मध्यवर्ती संघटनेशी संलग्न असून, संघटना पदाधिकारी तसेच राज्यातील हिवताप कर्मचारी या संपात कालपासूनच सहभागी झालेले आहेत. हिवताप संघटनेच्या वतीने ३ एप्रिल रोजी मांडण्यात आलेल्या मागण्यांमध्ये सुधारित राष्ट्रीय निवृत्तीवेतन योजना अंमलबजावणीसंदर्भात तात्काळ स्पष्टीकरणात्मक अधिसूचना जारी करण्याची प्रमुख मागणी करण्यात आली आहे. यासह हिवताप विभागातील १६ फेब्रुवारी २०२४ रोजीचा नियुक्ती प्राधिकारी बाबतचा शासन निर्णय रद्द करावा, सुधारित आकृतीबंध, नवीन सेवाप्रवेश नियम लागू करावेत, हिवताप विभागाचे जि.प.कडे होणारे हस्तांतरण रोखावे, तालुका आरोग्य कार्यालयात आरोग्य निरीक्षक व आरोग्य कर्मचारी यांना पदस्थापना द्यावी, कायम प्रवास भत्त्यात वाढ करावी, पदोन्नती व अन्य प्रलंबित प्रश्नांवर शासनाने तातडीने निर्णय घ्यावा, अशा विविध मागण्या संघटनेने मांडल्या आहेत. मागण्यांकडे दुर्लक्ष झाल्यास आंदोलन अधिक तीव्र करण्यात येईल, असा इशाराही संघटनांकडून देण्यात आला आहे. शासन व प्रशासनाने याची गांभीर्याने दखल घेऊन कर्मचाऱ्यांना न्याय द्यावा, अशी मागणी करण्यात येत आहे.

दरम्यान, संपाच्या दुसऱ्या दिवशी अहिल्यानगर जिल्हाधिकारी कार्यालयासमोर हिवताप कर्मचाऱ्यांनी आपल्या प्रलंबित मागण्यांसाठी जोरदार निदर्शने केली. या आंदोलनात राज्य सरचिटणीस पुरुषोत्तम आडेप, राज्य सरकारी निमसरकारी कर्मचारी समन्वयक समितीचे रावसाहेब निमसे, तसेच सुभाष तळेकर, अशोक मासाळ, अरुण लांडे, गोरक्ष कर्डिले, वैभव झरेकर, महेश पवार व हिवताप विभागातील सर्व कर्मचारी उपस्थित होते.

# प्लॉट घेवून देण्याच्या बहाण्याने सेवानिवृत्ताची ५ लाखांची फसवणूक

नगर – प्लॉट खरेदी करून देण्याचे आमिष दाखवून एका सेवानिवृत्त व्यक्तीची ५ लाख ५ हजार रुपयांची फसवणूक केल्याचा प्रकार उघडकीस आला आहे. याप्रकरणी तोफखाना पोलीस ठाण्यात फसवणुकीचा गुन्हा दाखल करण्यात आला आहे.

याबाबत अर्जुन ग्यानुजी कांबळे (वय ६७, रा. यशोदा नगर, पाईपलाईन रोड) यांनी फिर्याद दिली आहे. कांबळे यांच्या ओळखीचा अविनाश दिलीप घोजगे (रा. तळेगाव दाभाडे, जि. पुणे) हा प्लॉट खरेदी–विक्रीचा व्यवसाय करतो. कांबळे यांनी प्लॉट घेण्याची इच्छा व्यक्त केल्यावर घोजगे याने त्यांना आळंदी येथे एक जागा दाखवली. तो प्लॉट पसंत पडल्यानंतर बुकिंगसाठी ५ लाख रुपये देण्याचे ठरले. कांबळे यांनी विश्वासाने वेळोवेळी बँक खाते आणि गुगलपेद्वारे एकूण ५ लाख ५ हजार रुपये आरोपीच्या खात्यावर वर्ग केले.

पैसे मिळाल्यावर आरोपीने ना प्लॉट दिला, ना घेतलेली रक्कम परत केली. वारंवार मागणी करूनही घोजगे टाळाटाळ करत असल्याने कांबळे यांनी पोलिसांत धाव घेतली. अर्जाच्या चौकशीनंतर फसवणूक झाल्याचे स्पष्ट होताच पोलिसांनी गुन्हा दाखल केला आहे. सहायक पोलीस निरीक्षक गोंटला या प्रकरणाचा पुढील तपास करत आहेत.

# हिशोबाच्या वादातून एमआयडीसीतील कंपनीच्या कार्यालयाची तोडफोड

नगर – एमआयडीसी परिसरातील श्रेया इंडस्ट्रीज कंपनीमध्ये हिशोबाच्या कारणावरून वाद होऊन एकाच कुटुंबातील सदस्यांना लाथाबुक्क्यांनी आणि लाकडी फळीने बेदम मारहाण करण्यात आली. या घटनेत आरोपींनी कंपनीच्या कार्यालयातील साहित्याची तोडफोड करत नुकसान केले असून, एमआयडीसी पोलीस ठाण्यात तीन जणांविरुद्ध गुन्हा दाखल करण्यात आला आहे.

याबाबत बापूसाहेब नारायण गाडेकर (वय ६२, रा. खारे कर्जुने, ता.नगर) यांनी फिर्याद दिली आहे. त्यांच्या तक्रारीनुसार, २२ एप्रिल रोजी दुपारी १.३० च्या सुमारास संशयित आरोपी रामदास किसन गडकर, निलेश रामदास गडकर आणि शुभम रामदास गडकर (सर्व रा. शिर्डी, ता. राहता) हे एमआयडीसीतील श्रेया इंडस्ट्रीज कंपनीत आले होते. आमचा हिशोब आताच्या आता द्या, अशी मागणी त्यांनी गाडेकर यांच्याकडे केली. त्यावर गाडेकर यांनी तुमचा काय हिशोब झाला आहे तो दाखवा, असे म्हटले. या साध्या विचारणेचा राग अनावर झाल्याने संशयितांनी गाडेकर यांच्यासह त्यांचा मुलगा संदीप, पत्नी आणि नातू सुरज यांना अर्वाच्च भाषेत शिवीगाळ करण्यास सुरुवात केली.

वादाचे रूपांतर हाणामारीत होऊन तिन्ही संशयितांनी गाडेकर कुटुंबीयांना लाथाबुक्क्यांनी मारहाण केली. यावेळी निलेश गडकर याने लाकडी फळीने सुरज याच्या पाठीवर प्रहार केला. संशयितांनी एवढ्यावरच न थांबता कार्यालयातील टेबल आणि केबिनच्या काचा फोडून नुकसान केले. या गोंधळात फिर्यादीच्या गळ्यातील सोन्याची साखळी कोठेतरी पडून गहाळ झाली आहे. या प्रकरणी एमआयडीसी पोलिसांनी गुन्हा नोंदवला असून, सहाय्यक पोलीस निरीक्षक माणिक चौधरी या घटनेचा पुढील तपास करत आहेत.

## पप्पू उर्फ अजिज मणियार यांचे हृदयविकाराने निधन



नगर – शाहूनगर, केडगाव येथील रहिवाशी पप्पू उर्फ अजिज जमशेद मणियार (वय ५१) यांचे २३ एप्रिल रोजी हृदयविकाराने निधन झाले. त्यांचा दफनविधी केडगाव मुस्लिम स्मशानभूमीत करण्यात आला. त्यांच्या मागे वडील, दोन भाऊ, भावजया, पुतणी, पुतण्या असा परिवार आहे. डॉ.अकबर, आरिफ यांचे बंधू तर जमशेद मणियार यांचे ते चिरंजीव होत.

## कौशल्याबाई म्हस्के यांचे अल्प आजाराने निधन



नगर – नालेगाव येथील रहिवाशी श्रीमती कौशल्याबाई सोन्याबापू म्हस्के (८६) यांचे २३ एप्रिल रोजी अल्पशा आजाराने निधन झाले. त्यांच्या पार्थिवावर नालेगाव अमरधाम येथे अंत्यसंस्कार करण्यात आले.

त्यांच्या मागे दोन मुले, सुना, एक बहीण, नातेवाईक असा परिवार आहे. अनिल म्हस्के (वस्ताद) यांच्या मातोश्री होत.

## कादरभाई शेख यांचे अल्प आजाराने निधन



नगर – चिचोंडी पाटील येथील रहिवासी कादरभाई बशीर शेख (टेलर, वय ६१) यांचे २३ एप्रिल रोजी अल्प आजाराने निधन झाले. त्यांचा दफनविधी चिचोंडी पाटील येथील मुस्लिम कब्रस्तानात करण्यात आला. त्यांच्या मागे पत्नी, १ मुलगा, २ मुली, सुन, जावई, नातवंडे असा परिवार आहे. नगर येथील कर सल्लागार अरबाज शेख यांचे ते वडील होत.

# शेंडी बायपास व बुरूडगाव येथे पाण्यात बुडून दोन युवकांचा मृत्यू

नगर – शहराजवळील शेंडी बायपास व बुरूडगाव येथे २१ एप्रिल रोजी दोन वेगवेगळ्या ठिकाणी घडलेल्या दुर्दैवी घटनांमध्ये पाण्यात बुडून दोन जणांचा मृत्यू झाल्याच्या घटना समोर आल्या आहेत. या घटनांमुळे परिसरात हळहळ व्यक्त केली जात आहे. दोन्ही घटनांमध्ये कोणताही संशयास्पद प्रकार आढळून आलेला नसून पाण्यात बुडाल्याने मृत्यू झाल्याचे प्राथमिक तपासात स्पष्ट झाले आहे.

पहिली घटना शेंडी परिसरात घडली. प्रदीप भानुदास नन्नवरे (वय १५, रा. शेंडी बायपास) हा मुलगा हॉटेल किनाराच्या मागील बाजूस असलेल्या पाण्यात पोहण्यासाठी गेला होता. मात्र पोहत असताना तो पाण्यात बुडाला. ही बाब लक्षात आल्यानंतर त्याचा भाऊ विकास अशोक नन्नवरे याने त्याला तातडीने बाहेर काढून उपचारासाठी जिल्हा शासकीय रूग्णालयात दाखल केले. परंतु डॉक्टरांनी तपासून त्याला उपचारापूर्वीच मृत घोषित केले. या प्रकरणी एमआयडीसी पोलीस ठाण्यात अकस्मात मृत्यूची नोंद करण्यात आली आहे.

दुसरी घटना बुरूडगाव परिसरात घडली. विशाल संजय बर्फे (वय २४, रा. सावतानगर, भिंगार) हा युवक बाळू पवार यांच्या विहिरीत बुडाला. घटनेनंतर त्याला त्याच्या नातेवाईकांनी खासगी रूग्णवाहिकेव्दारे जिल्हा शासकीय रूग्णालयात उपचारासाठी आणले. मात्र डॉक्टरांनी तपासून त्याला मृत घोषित केले. या प्रकरणी अहिल्यानगर तालुका पोलीस ठाण्यात अकस्मात मृत्यूची नोंद करण्यात आली आहे.

## पुष्पाबाई सोनार यांचे अल्प आजाराने निधन



नगर – सोनारगल्ली, जामखेड येथील रहिवाशी श्रीमती पुष्पाबाई रामचंद्र सोनार (वय ८२) यांचे १६ एप्रिल रोजी अल्प आजाराने निधन झाले. त्यांच्या पार्थिवावर जामखेड येथे अंत्यसंस्कार करण्यात आले. त्यांच्या मागे दोन मुले, तीन मुली, सुना, जावई, नातवंडे असा परिवार आहे. सतीश सोनार व धिरज सोनार, संगीता पोतदार, वंदना सोनार, शुभांगी बारस्कर यांच्या मातोश्री तर सुबोध व उदय पारखे यांच्या त्या आत्या होत.





प्रस्तावित पाणीपट्टी वाढ रद्द करण्याचे निवेदन देताना ठाकरे शिवसेनेचे महानगर प्रमुख किरण काळे. समवेत संजय झिंजे, मनोज गुंदेचा, विलास उबाळे, अनिस चुडीवाला, रावजी नांगरे, दीपक भोसले, राम वाणी आदी.

# महापालिकेचा छुप्या पद्धतीने पाणीपट्टी दरवाढीचा डाव

### दरवर्षी दोनशे रुपयांची वाढ; पुढील पाच वर्षांत सुमारे १७०० रुपयांची होणार अतिरिक्त वाढ

नगर – महापालिकेच्यावतीने पाणीपट्टीत दरवर्षी २०० रुपयांची दरवाढ प्रस्तावित करण्यात आलेली आहे. ही दरवाढ पुढील ५ वर्षांसाठी असणार आहे. त्यामुळे पुढील पाच वर्षात नगरकरांवर पाणीपट्टीचा अतिरिक्त १७०० रुपयांचा बोजा वाढणार आहे. त्यामुळे सर्वसामान्य नगरकरांवर वाढीव पाणीपट्टीचा मोठा बोजा पडणार आहे. त्यामुळे नगरकरांमध्ये संताप दिसून येत आहे.

वाढीव पाणी पट्टी दरांमुळे सर्वसामान्यांवर आर्थिक ताण वाढत आहे. सेवा शून्य, मात्र दरवाढ पूर्ण आहे. वेग वेगळ्या पाणी योजनांवर आजवर कोट्यवधी खर्चूनही ३६५ दिवस, मुबलक आणि स्वच्छ पाणी नाही. त्यामुळे पाणी पट्टी वाढीचा नैतिक अधिकार मनपाला नाही. प्रति वर्ष दोनशे रुपयांची वाढ करून मनपाचा छुप्या पद्धतीने पाणीपट्टीच्या वारेमाप दरवाढीचा डाव सुरू असल्याचा आरोप, ठाकरे शिवसेनेचे महानगर प्रमुख किरण काळे यांनी केला आहे.

शहरातील पाणीपट्टी दरवाढ तात्काळ स्थगित करावी, अशी मागणी नागरिकांच्या वतीने महानगरपालिका प्रशासनाकडे विरोधी पक्षांनी केली आहे. यासंदर्भात आयुक्त यशवंत डांगे यांच्यावतीने उपायुक्तांनी काळे यांचे निवेदन स्वीकारले. यावेळी संजय झिंजे, मनोज गुंदेचा, विलास उबाळे, अनिस चुडीवाला, रावजी नांगरे, दीपक भोसले, राम वाणी, राम झिने, चंद्रकांत उजागरे, संजय कांबळे, राम धोत्रे, उषा भगत, शारदा वाघमारे, मीना रणशूर, विकास भिंगारदिवे, किशोर कोतकर, शंकर आव्हाड, विनोद शिरसाट, माजी नगरसेवक फैयाज शेख, हाफिज सय्यद, धनंजय देशमुख, गणेश आपरे, आकाश आल्हाट उपस्थित होते.

निवेदनात म्हटले आहे, आजवर फेज १, फेज २ आणि अमृत योजने अंतर्गत तीनशे कोटींपेक्षा अधिक खर्च झाला. मात्र, तरीही अनेक भागांमध्ये नियमित व पुरेसा पुरवठा होत नाही. घरगुती वापरासाठी ९०० ते ४००० रुपयांपर्यंत वाढ करण्यात आली असून, दरवर्षी २०० रुपयांची वाढ करण्याचा निर्णय घेतला गेला आहे. पुढील पाच वर्षांत छुप्या पद्धतीने सुमारे १७०० रुपयांची अतिरिक्त वाढ होणार आहे. ही वाढ सर्वसामान्यांना परवडणारी नाही. त्यामुळे पाणीपट्टी दरवाढ लागू करू नये. तसेच पाणीपुरवठा व्यवस्थेत तात्काळ सुधारणा करून नियमित व पुरेसा पाणीपुरवठा सुनिश्चित करावा, अशी मागणी करण्यात आली आहे. पाणीपट्टीत कपात करण्याची घोषणा करण्यात आली असली तरी मूळ दरवाढीचा या पूर्वीचा ठराव कायम ठेवण्यात आला आहे. प्रशासनाकडून करदात्यांची दिशाभूल केली जात असल्याचा आरोप, किरण काळे यांनी केला आहे.

## सोन्या चांदीच्या दरात घसरण

दिल्ली – एमसीएक्स वर २३ एप्रिल रोजी सुरुवातीच्या व्यवहारांमध्ये, अमेरिका आणि इराण यांच्यातील नव्याने निर्माण झालेल्या तणावाचा मागोवा घेत क्रूडच्या किमतींमध्ये झालेली वाढ आणि त्यापाठोपाठ अमेरिकन डॉलर वधारल्यामुळे झालेल्या प्रॉफिट बुकिंगच्या पार्श्वभूमीवर सोन्याचे दर अर्ध्या टक्क्यांहून अधिकने घसरले, तर चांदीच्या दरात २ टक्के हून अधिकची मोठी घसरण झाली.

देशांतर्गत वायदे बाजार, एमसीएक्सवर सोन्याचे जून फ्युचर्स ०.५० टक्के घसरून १,५१,९४७ रुपये १० ग्रॅमवर कमी झाले तर, एमसीएक्स चांदीचे मे महिन्याचे सौदे जवळपास २ टक्के घसरणीसह अडीच लाखांच्या खाली २,४३,८५६ प्रति किलोवर उतरले.


## जाहीर नोटीस

तमाम लोकांस या जाहीर नोटिसीने कळविणेत येते की, खालील परिशिष्टात वर्णन केलेल्या मिळकतीचे विद्यमान मालक **१. शबाना जावेद शेख रा.गिता को ऑप हौसिंग सोसायटी, सिनेगॉग स्ट्रीट, पुणे २. खानम मोहम्मद हुसैन खान, ३. सना आकिब उर्फ आकिफ शेख, ४. अंजुम हन्नान सय्यद (सय्यद अंजुम अब्दुल हन्नान) नं.२ ते ४ रा.कोंढवा खुर्द, पुणे हे** असून सदर मिळकत त्यांच्या मालकीची व कब्जे वहिवाटीची असून सदर मिळकतीचा आमचे अशिल यांचे बरोबर खरेदीचा व्यवहार ठरला असून, सदर मिळकतीच्या खरेदीपोटी आमच्या अशिलाने विद्यमान मालक यांना विसारापोटी रक्कम दिलेली आहे. विद्यमान मालक यांनी सदरची मिळकत ही निर्वेध, निर्जोखीम व बोजा विरहीत तसेच सदर मिळकतीवर कोणाचाही कसल्याही प्रकारचा हक्क, अधिकार व हितसंबंध नसल्याबाबतची खात्री व भरवसा दिला आहे. तथापि सदर मिळकती मध्ये कोणाचाही कसल्याही प्रकारचा हक्क, तोंडी अथवा लेखी करार, खरेदीखत, साठेखत, लिज, इजमेंट, मनाईहुकूम, बक्षीस, वारस हक्क, अटॅचमेंट, खासगी अथवा सरकारी, निमसरकारी बोजा असल्यास कोणत्याही स्वरुपात हक्क अधिकार असल्यास ही नोटीस प्रसिद्ध होताच ७ दिवसांच्या आत कागदोपत्री पुराव्यासह खाली दिलेल्या पत्यावर कळवावे. मुदतीत कोणाचीही हरकत न आल्यास सदर मिळकतीवर कोणाचाही कसल्याही प्रकारचा हक्क हितसंबंध नाही, असे समजून अथवा असल्यास तो त्यांनी जाणीवपूर्वक सोडून दिला आहे. असे गृहित धरून व सदर मिळकत ही निर्वेध, निर्जोखीम आहे, असे ग्राह्य धरून आमचे अशिल हे खरेदीखताचा व्यवहार पूर्ण करतील. त्यानंतर कोणाचीही कोणत्याही प्रकारची हरकत विचारात घेतली जाणार नाही, याची नोंद घ्यावी. (दि.२३/४/२०२६)

**परिशिष्ट : मिळकतीचे वर्णन** : डि. अहिल्यानगर सब डिव्हीजन व तालुके अहिल्यानगर पैकी, अहिल्यानगर महानगरपालिका हद्दीतील मौजे अहिल्यानगर–१ (शहर अहिल्यानगर) येथील माळीवाडा भागातील अ) सिटी सर्व्हे नंबर ४६७४/अ चे क्षेत्र ५९.१० चौ.मी. ही संपूर्ण मिळकत ब) सिटी सर्व्हे नंबर ४६७४/क चे क्षेत्र ७.७० चौ.मी. ही संपूर्ण मिळकत व क) सिटी सर्व्हे नंबर ४६७४/ड चे क्षेत्र ६७.०० चौ.मी., यापैकी विद्यमान मालक यांच्या मालकीचे उत्तर बाजूकडील संपूर्ण क्षेत्र ५१.८८ चौ.मी. या मिळकती व त्यावरील बांधकामासह बाबत. **यांसी चतुः सिमा खालील प्रमाणे– सरकारी रेकॉर्ड प्रमाणे** येणेप्रमाणे चतुर्सिमा पूर्वक मिळकती यामधील वागणुकीच्या, वहिवाटीच्या येणे–जाणे हक्कासह काही एक राखून न ठेविता असे.

**ॲड. सचिन चंद्रकांत फुलसौंदर,**
ऑफिस– तळ मजला, आनंद हाईटस,जुने जिल्हा न्यायालयासमोर, अहिल्यानगर मो. नं. ९९२२२२७१७८

## जाहीर नोटीस

तमाम लोकांस या जाहीर नोटिसीने कळविणेत येते की, खालील परिशिष्टात वर्णन केलेल्या मिळकतीचे विद्यमान मालक नंबर **१. श्री. स्वप्नील सुनील आगरकर रा. माळीवाडा, अहिल्यानगर, २. श्री. योगेश बाळासाहेब झुंगे रा. नालेगाव, अहिल्यानगर आणि ३. श्री. सागर धर्मा कदम रा. अहिल्यानगर** यांच्या मालकीची व कब्जे वहिवाटीची असून सदर मिळकतीचा आमचे अशिल यांचे बरोबर खरेदीचा व्यवहार ठरला असून, सदर मिळकतीच्या खरेदीपोटी आमच्या अशिलाने विद्यमान मालक यांना विसारापोटी रक्कम दिलेली आहे. सदर मिळकतीवर **डॉन बॉस्को नागरी सहकारी पतसंस्था, अहमदनगर या पतसंस्थेचा** बोजा व्यतिरिक्त सदरची मिळकत ही निर्वेध, निर्जोखीम व बोजा विरहीत असून तसेच सदर मिळकतीवर कोणाचाही कसल्याही प्रकारचे हक्क, अधिकार व हितसंबंध नसल्याबाबतची खात्री व भरवसा विद्यमान मालक यांनी दिला आहे. तथापि सदर मिळकतीमध्ये कोणाचाही कसल्याही प्रकारचा हक्क, तोंडी, अथवा लेखी करार, खरेदीखत, साठेखत, लिज, इजमेंट, मनाईहुकूम, बक्षीस, वारस हक्क, अटॅचमेंट, खासगी अथवा सरकारी, निमसरकारी बोजा असल्यास कोणत्याही स्वरुपात हक्क अधिकार असल्यास ही नोटीस प्रसिद्ध होताच ७ दिवसांच्या आत कागदोपत्री पुराव्यासह खाली दिलेल्या पत्यावर कळवावे. मुदतीत कोणाचीही हरकत न आल्यास सदर मिळकतीवर कोणाचाही कसल्याही प्रकारचा हक्क हितसंबंध नाही, असे समजून अथवा असल्यास तो त्यांनी जाणीवपूर्वक सोडून दिला आहे. असे गृहित धरून व सदर मिळकत ही निर्वेध, निर्जोखीम आहे, असे ग्राह्य धरून आमचे अशिल हे खरेदीखताचा व्यवहार पूर्ण करतील. त्यानंतर कोणाचीही कोणत्याही प्रकारची हरकत विचारात घेतली जाणार नाही, याची नोंद घ्यावी.
परिशिष्ट : मिळकतीचे वर्णन– डि अहमदनगर सब डिव्हीजन व तालुके अहिल्यानगर पैकी, अहमदनगर जिल्हा परिषद हद्दीतील **मौजे वाकोडी** येथील बिनशेती प्लॉट मिळकत खालील प्रमाणे वर्णनाची

| सर्व्हे नंबर | भूखंड नंबर | क्षेत्रफळ |
|---|---|---|
| २०२/१ | १ | १००.०० चौ.मी. |

यापैकी विद्यमान यांच्या मालकीचे क्षेत्र ८५.५० चौ.मी. यामध्ये विद्यमान मालक नंबर १ यांच्या मालकीचे क्षेत्र २८.५० चौ.मी., विद्यमान मालक नंबर २ यांच्या मालकीचे क्षेत्र २८.५० चौ.मी. व विद्यमान मालक नंबर ३ यांच्या मालकीचे क्षेत्र २८.५० चौ.मी., याचा – ग्रामपंचायत मिळकत नंबर ४३४ असा असून यावरील संपूर्ण बांधकामासह मिळकत.

**यांसी चतुः सिमा खालील प्रमाणे** पुर्वेस स.नं.२०२ पैकी रणजीत बिस्ट यांची मिळकत पश्चिमेस वाकोडी रोड व मिळकतीपैकी दक्षिणेस बोळ व मिळकतीपैकी, उत्तरेस–बोळ येणेप्रमाणे चतुर्सिमा पूर्वक बिनशेती प्लॉट मिळकत काही एक राखून न ठेविता. (दि.२३/४/२०२६)

**ॲड. सचिन चंद्रकांत फुलसौंदर,**
ऑफिस– तळ मजला, आनंद हाईटस,जुने जिल्हा न्यायालयासमोर, अहिल्यानगर मो. नं. ९९२२२२७१७८

## जाहीर नोटीस

या जाहीर नोटीसीने तमाम लोकांस कळविणेत येते की, खालील परिशिष्ठात नमुद केलेल्या प्लॉटस् मिळकती विद्यमान मालक **१.नन मुनीसा मोहमंद इक्बाल जहागीरदार, २.लबिब मोहमंद इक्बाल जहागीरदार, ३. शाहेन मोहमंद इक्बाल जहागीरदार, ४.अलिफिया अकिल कुरेशी,१ ते ४ रा.पुणे. ५. सिमाब मोहसिन जहागिरदार, ६. शेख सारिका तौफिक, ५ ते ६ रा. अहिल्यानगर. ७.शेख महंमद नसीम,रा.पुणे. ८.शेख एतेशान लिकायत, ९.शेख फिरा लीकायत,रा.पुणे. १०. अझीम अबरार शेख, ११. इरफाना अबरार शेख, १२. सफिना अजाउद्दीन शेख, १३. सबा अबरार शेख, १४. शेख अल्लताफ हुसेन, १५.शेख असरार हुसेन. १० ते १५ सर्व रा. अहिल्यानगर.** यांचे मालकी वहिवाटीचा असून यांनी सदर प्लॉट मिळकतीचे विक्री करण्याचा करार करुन आमचे अशिलांबरोबर कायमखुष खरेदी देण्यांचे ठरविले असून सदरची मिळकतीचे खरेदी विक्रीचा करारनामा आमचे अशिलाबरोबर केलेला आहे व व्यवहारापोटी विसार म्हणून रक्कम सुध्दा घेतलेली आहे.

परंतु कोणाचीही तक्रार राहु नये म्हणून या जाहीर नोटीसीने कळविण्यांत येते की सदर मिळकतीबाबत कोणतेही चालू वाद असल्यास अथवा साठेखत, खरेदीखत,गहाणखत, दान, वारस हक्क, बक्षिसपत्र मनाईहुकुम, दावा कोर्ट कारवाई बँक बोजा सोसायटी राईटस अन्य वस्त्र लिज अथवा अगर कोणताही कसल्याही प्रकारचा हक्क, हितसंबंध असल्यास संबंधिताने ही नोटीस प्रसिध्द झाले पासून ७ **दिवसांचे** आत खालील दिलेल्या पत्यावर संपुर्ण कागदोपत्री पुराव्यानिशी लेखी कळवावे, जर मुदतीत कोणाचेही कोणतेही हरकत न आल्यास आमचे अशिल सदर प्लॉटस् खरेदी विक्रीचा व्यवहार पूर्ण करतील मग कोणाचेही कोणत्याही प्रकारे अगर हरकत चालणार नाही, असल्यास त्यांनी जाणीवपूर्वक सोडुन दिले आहे असे समजण्यांत येईल.

परिशिष्ट : **मिळकतीचे वर्णन** – जिल्हा तुकडी अहिल्यानगर पो.तु.ता.नगर पैकी अहिल्यानगर जिल्हा परिषद हद्दीतील मौजे निंबळक येथील गट नं. २९०/अ मधील बिगरशेती प्लॉटस्चे वर्णन खालील प्रमाणे.

| | | चतु:सिमा | | | |
|---|---|---|---|---|---|
| प्लॉट नं. | क्षेत्र चौ.मी. | पूर्वे | दक्षिण | पश्चिम | उत्तर |
| १ | ४३४.८६ | प्लॉट नं.२ | २९०/१ पैकी | स.नं. २९० पैकी | १२ मी.रस्ता |
| २ | ४३४.८६ | प्लॉट नं.३ | २९०/१ पैकी ओपन स्पेस | प्लॉट नं.१ | १२ मी.रस्ता |

या संपूर्ण प्लॉटस् बाबत...

ता. २३/०४/२०२६,
अहिल्यानगर

**एस.एन.भोगाडे (एम.ए.एल.एल.बी.)**
पत्ता : स्टेट बँक चौक, अहमदनगर–४१४००१, मो : ९४२०३३५५३५, ८२०८७३०७००

# गृहिणी

## आरोग्य

### उष्माघातापासून करा बचाव...

उष्माघात ही उन्हाळ्याच्या दिवसांत, विशेषतः भारतासारख्या उष्ण देशांमध्ये एक सामान्य समस्या आहे. जेव्हा शरीराचे तापमान अत्याधिक वाढते आणि ते नियंत्रणाबाहेर जाते, तेव्हा उष्माघात होऊ शकतो. या स्थितीमुळे शरीरातील पाणी आणि इलेक्ट्रोलाइट्स कमी होतात, ज्यामुळे अशक्तपणा, चक्कर येणे, डोकेदुखी आणि गंभीर परिस्थितीत बेशुद्धी देखील येऊ शकते. काही फळे नैसर्गिकरित्या या गरजा पूर्ण करण्यास मदत करू शकतात. या फळांमध्ये पाण्याचे प्रमाण जास्त असते आणि ती आवश्यक पोषक तत्वांनी समृद्ध असतात, जे शरीराला थंड करण्यास आणि लवकर बरे होण्यास मदत करतात. टरबूजामध्ये ९०% पेक्षा जास्त पाणी असते, ज्यामुळे ते डिहायड्रेशनशी लढण्यासाठी एक उत्कृष्ट फळ ठरते. त्यात पोटॅशियमसारखे नैसर्गिक इलेक्ट्रोलाइट्स देखील भरपूर प्रमाणात असतात, जे शरीरातील द्रवांचे संतुलन राखण्यास मदत करतात. टरबूज खाल्ल्याने शरीर थंड होते आणि ताजेतवाने वाटते. आंबा केवळ चविष्टच नाही तर पोषक तत्वांनीही समृद्ध आहे. त्यात व्हिटॅमिन ए, व्हिटॅमिन सी आणि पोटॅशियम यांसारखी आवश्यक पोषक तत्वे असतात. आंबा शरीराला ऊर्जा देतो आणि शरीर थंड ठेवण्यासही मदत करतो. तथापि, आंब्यामध्ये साखरेचे प्रमाण जास्त असते, त्यामुळे त्याचे सेवन जपून करावे.

## पाककला

### तंदूरी रोटी

**साहित्य** – गव्हाचे पीठ – दोन कप, मैदा – अर्धा कप, दही – अर्धा कप, बेकिंग पावडर– अर्धा चमचा, बेकिंग सोडा – अर्धा चमचा, मीठ – चवीनुसार, साखर – अर्धा चमचा, तेल / तूप – १ टेबलस्पून, पाणी – मळण्यासाठी, सुके पीठ – लाटण्यासाठी

**कृती** – सर्वात आधी सर्वप्रथम एका भांड्यात गव्हाचे पीठ, मैदा, बेकिंग पावडर, बेकिंग सोडा, मीठ आणि साखर मिसळा. आता त्यात दही आणि तेल घाला आणि हळूहळू पाणी घालून मऊ पीठ मळून घ्या. हे पीठ झाकून ठेवा आणि १–२ तास सेट होऊ द्या आणि पीठातून मध्यम आकाराचे पीठ बनवा. तसेच सुक्या पीठात पीठ घाला आणि रोलिंग पिनने गोल किंवा गोल रोटी लाटा. आता रोटीच्या एका बाजूला थोडे पाणी लावा आणि गॅसवर पॅन गरम करा. आता रोटीची ओली बाजू तव्यावर चिकटवा. ३०–४० सेकंदांनंतर, पॅन उलटा करा आणि रोटी थेट आचेवर शिजवा. नंतर ते चिमट्याने उलटा आणि दोन्ही बाजूंनी कुरकुरीत आणि मऊ होईपर्यंत शिजवा. आता त्यावर तूप किंवा बटर लावा आणि गरमागरम सर्व्ह करा.

## वास्तू

### वर्क फ्रॉम होम साठी दिशा

* घरी काम करण्यासाठी कोणती दिशा सर्वात शुभ आहे? – घरातून काम करण्यासाठी पूर्व आणि उत्तर दिशा सर्वात शुभ मानल्या जातात.

* बेडरूममध्ये काम करणे योग्य आहे का? – नाही, त्याने आळशीपणा वाढतो. शक्य असल्यास, एक वेगळी खोली किंवा कोपरा निवडा.

* गॅजेटस् कोठे ठेवावेत? – टेबलाच्या दक्षिण पूर्व (आग्नेय) भागात लॅपटॉप आणि इतर गॅझेटस् ठेवावेत.

## सौंदर्य

एका भांड्यात काकडीचा रस काढून घ्या. नंतर त्यात थोडे सफरचंद व्हिनेगर आणि व्हिटॅमिन ई कॅप्सूल मिसळा. दोन्ही एकत्र मिसळल्यानंतर टोनर तयार होईल.

## सल्ला

बागेतली वाळलेली पाने आपल्या झाडांसाठी खत म्हणून वापरावीत. तुमची बाग वर्षभर हिरवीगार राहील. मात्र निलगिरीची पाने कुजायला खूप वेळ घेतात, त्यामुळे ती खत म्हणून वापरू नयेत. तुम्ही तो एका स्प्रे बॉटलमध्ये साठवून ठेवू शकता.

**संकलक : ॲड. सौ. पूजा गुंदेचा**

# दैनिक पंचांग

शुक्रवार, दि. २४ एप्रिल २०२६

**दुर्गाष्टमी, शके १९४८ पराभवनामसंवत्सर, वैशाख शुक्लपक्ष, पुष्य २०।१४, सूर्योदय ०६ वा. २६ मि. सूर्यास्त ०५ वा. ३० मि.**

## राशिभविष्य

**मेष** : कायदेशीर सल्ल्यासाठी वकिलांना भेटायला चांगला दिवस. वैवाहिक आयुष्य आजच्या इतकं सुखद कधीच नव्हतं, याची प्रचिती तुम्हाला येईल.

**वृषभ** : ज्यांची किंमत वाढतच जाणार आहे अशा वस्तूंच्या खरेदीसाठी आजचा दिवस शुभ आहे.

**मिथुन** : तुमच्या हृदयाला आवाहन करतील अशा एखाद्या व्यक्तीशी भेट होण्याचा जबरदस्त योग आहे.

**कर्क** : आरोग्य बरे राहील. सर्जनशील व्यक्तींना वाव मिळेल. दिवस आनंदात व्यतीत होईल. आर्थिक विषयांमध्ये आपले प्रयत्न आपणास यश मिळण्याचे कारण ठरतील.

**सिंह** : शत्रू पराभूत होतील. आज आपणास कठोर श्रम करावे लागेल. काही निष्कारण चिंतांमुळे आपली व्यग्रता वाढेल. कोणत्याही कार्यात बेपर्वाईने वागू नका.

**कन्या** : ध्येय साध्य करण्यात पूर्ण यश मिळेल. कौटुंबिक विषयांमध्ये वेळ चांगला जाईल.

**तूळ** : आरोग्य उत्तम राहील. काहीकाळ कठीण गेल्यानंतर यश मिळेल. आजचा दिवस कालच्या दिवसापेक्षा चांगला नसेल.

**वृश्चिक** : आपण पूर्वीपासून आपल्या मनात असलेल्या योजनेबद्दल अतिउत्साही आहात. आर्थिक विषयांमध्ये आपले प्रयत्न आपणास यश मिळण्याचे कारण ठरतील.

**धनु** : आपल्या आवडी–निवडींप्रमाणे कार्य करण्यासाठी आजचा दिवस सर्वांत उत्तम आहे. शत्रू प्रभावहीन होतील.


**मकर** : दिवस संमिश्र जाईल. आर्थिक नुकसानीची शक्यता आहे. आरोग्याची काळजी घ्या. व्यस्त राहाल. मानसिक स्थिरता वाढेल.

**कुंभ** : जर आपणास आपले निवासस्थान बदलण्याची इच्छा असेल तर आजचा दिवस उत्तम आहे.

**मीन** : व्यापाऱ्यांसाठी परिस्थिती साधारण. जोडीदाराशी वादविवाद टाळा. कौटुंबिक विषयांमध्ये पैसा खर्च होईल.

# फिल्मीचक्कर क्र. १२३३

सौ. शैलजा कुलकर्णी



**आडवे शब्द :–** ३) जुन्या काळातील एक अभिनेता – +++ आगा ६) एक प्रसिद्ध दिवंगत गीतकार ८) एक अभिनेता +++ हसन ११) ++ ++ सपने (चित्रपटाचे नाव) १२) ++ + ++ आशिक हैं सदीयों पुराने (गाणे) १३) ++ दिल जो प्यार करेगा ओ गाना गायेगा ('संगम'मधील गाणे) १४) 'तिसरी मंझील, मेरा गांव मेरा देश, कटी पतंग, आन मिलो सजना' आदी चित्रपटांची नायिका

**उभे शब्द :–** १) प्यार ++++ (चित्रपटाचे नाव) २) ++ ++ मंदिर (चित्रपटाचे नाव) ३) ++ ++ ++ ++ प्यार के चर्चे हर जबान पर सबको मालूम है और सबको खबर (गाणे) ४) ++ और गोरी (चित्रपटाचे नाव) ५) ++ है ईमान मेरा यार मेरी जिंदगी (चित्रपटाचे नाव) ७) दिवंगत अभिनेता राजकुमारचा अभिनेता पुत्र ९) ++ ++ + सामने (चित्रपटाचे नाव) १०) राम और ++ (चित्रपटाचे नाव) १२) जब ++ जवां होंगे जाने कहां होंगे (गाणे)

# * * * * * * मुलांचे विश्व * * * * * *

**सुविचार** : कुणाचा साधा स्वभाव म्हणजे हा त्याचा कमीपणा नसतो तर त्याचे संस्कार असतात.

# मुलांसाठी भन्नाट माहिती ज्ञानरंजन

## स्टील, तांबे की काच? कोणती बाटली सर्वात सुरक्षित आहे?

निरोगी जीवनशैलीसाठी पुरेसे पाणी पिणे पुरेसे नाही; तुम्ही वापरत असलेले भांडे किंवा बाटली देखील महत्त्वाची आहे. तज्ञांच्या मते, पाण्याच्या बाटलीच्या निवडीचा आपल्या आरोग्यावर थेट परिणाम होऊ शकतो. आजकाल, वाढत्या आरोग्यविषयक जागरूकतेमुळे, लोक प्लास्टिकच्या बाटल्या सोडून तांबे, स्टेनलेस स्टील आणि काचेच्या पर्यायांकडे वळत आहेत. हे सर्व पर्याय सुरक्षित मानले जात असले तरी, त्यांचे गुणधर्म आणि फायदे लक्षणीयरीत्या भिन्न आहेत.

तांब्याची बाटली – भारतीय संस्कृती आणि आयुर्वेदात शतकानुशतके तांब्याच्या भांड्यांचा वापर केला जात आहे. तांब्यामध्ये नैसर्गिक सूक्ष्म जीवविरोधी गुणधर्म आहेत, जे पाण्यात वाढणाऱ्या हानिकारक जीवाणूंना प्रभावीपणे नष्ट करतात. वैज्ञानिक संशोधनातून हे देखील सिद्ध झाले आहे की, जेव्हा पाणी तांब्याच्या बाटलीत काही तासांसाठी साठवले जाते, तेव्हा ते तांब्यामधील सूक्ष्म घटक शोषून घेते. हे तांब्याने समृद्ध असलेले पाणी शरीराची रोगप्रतिकारशक्ती वाढवण्यास मदत करते. तसेच ते पचनक्रिया जलद करते आणि थायरॉईड–संबंधित समस्यांपासून आराम देऊ शकते. तांब्याचे सूक्ष्म घटक शरीरातील आवश्यक एन्झाइम्सचे उत्पादन वाढवतात, जे अन्न जलद आणि योग्यरित्या पचण्यास मदत करतात.

स्टेनलेस स्टील – आजच्या वेगवान जीवनात स्टेनलेस स्टीलच्या बाटल्या एक लोकप्रिय पर्याय बनल्या आहेत. या बाटल्या केवळ टिकाऊ आणि सुरक्षितच नाहीत, तर स्वच्छ करायलाही सोप्या आहेत. स्टीलच्या बाटल्यांचा सर्वात मोठा फायदा हा आहे की, त्यांमध्ये कोणतेही हानिकारक रसायने किंवा दुर्गंधी नसते. शिवाय, व्हॅक्यूम–इन्सुलेटेड स्टीलच्या बाटल्या दीर्घकाळ पाणी थंड किंवा गरम ठेवू शकतात, ज्यामुळे त्या प्रवासासाठी आणि ऑफिससाठी आदर्श ठरतात.

काचेची बाटली – ज्यांना कोणत्याही रसायनांपासून किंवा धातूच्या चवीपासून पूर्णपणे दूर राहायचे आहे, त्यांच्यासाठी काचेच्या बाटल्या हा एक उत्तम आणि सुरक्षित पर्याय आहे. काच पूर्णपणे रसायनमुक्त असते, त्यामुळे मिनरल वॉटर साठवण्यासाठी हे सर्वात सुरक्षित भांडे ठरते. तथापि, काचेच्या बाटल्यांसमोरील सर्वात मोठे आव्हान म्हणजे त्यांचा टिकाऊपणा; त्या रोजच्या जास्त वापरासाठी तितक्याशा योग्य नसतात आणि त्यांना काळजीपूर्वक हाताळण्याची आवश्यकता असते.

देखभाल आणि स्वच्छता – कोणत्याही भांड्याचे फायदे ते योग्य काळजीने स्वच्छ केल्यावरच मिळतात. तांब्याच्या बाटलीची देखभाल करण्यासाठी विशेष काळजी घेणे आवश्यक आहे. तांब्याची चमक आणि गुणधर्म टिकवून ठेवण्यासाठी ते लिंबू, मीठ किंवा व्हिनेगरच्या द्रावणाने नियमितपणे स्वच्छ केले पाहिजे.

बाटली स्वच्छ केल्यानंतर ती पूर्णपणे कोरडी करणे आवश्यक आहे. याउलट, स्टीलच्या बाटल्या साध्या साबण आणि पाण्याने सहज स्वच्छ करता येतात आणि त्या दीर्घकाळ टिकतात. जर तुम्ही औषधी गुणधर्मांसाठी बाटली शोधत असाल, तर तांबे सर्वोत्तम आहे, परंतु सोय आणि टिकाऊपणासाठी स्टेनलेस स्टील हा एक अतुलनीय पर्याय आहे.

## प्रेमभाव

एक साधू तपश्चर्येस एका निर्जन स्थळी बसले होते. त्या ठिकाणी एका यक्षाचे वास्तव्य होते. या गोष्टीची साधूला कल्पना नव्हती. ते जेव्हा तेथे पोहोचले तेव्हा निर्जन स्थान पाहून त्यांनी तेथेच ध्यानधारणा सुरू केली. त्या वेळी यक्ष तेथे नव्हता. रात्री जेव्हा यक्ष तेथे आला तेव्हा आपल्या जागेवर दुसऱ्याच व्यक्तीला पाहून त्याला राग आला. त्याने मोठ्याने आरडाओरड सुरू केली. पण समाधी अवस्थेत असलेल्या साधूवर त्याचा काहीच परिणाम झाला नाही.

मग यक्षाने वेगवेगळी रूपे घेऊन साधूला घाबरविण्याचा प्रयत्न केला. शेवटी त्याने विषारी सापाचे रूप धारण करून त्यांना दंश केला तरीही त्यांच्यावर याचा काहीच परिणाम दिसेना. इतक्या प्रयत्नानंतरही साधूवर कोणताही परिणाम न झाल्याने यक्ष झालेल्या श्रमाने थकून सर्परूपातच विश्रंती घेऊ लागला. थोड्याच वेळात साधू महाराजांची समाधी अवस्था पूर्ण झाली व ते जागे झाले व त्यांची नजर सर्परूपी यक्षावर पडली. त्या नजरेत इतका प्रेमभाव भरलेला होता की त्या कृपादृष्टीने सापाच्या अंगातील विष अमृत बनले. यक्ष साधूंना शरण गेला व त्याने त्यांना आदरपूर्वक वंदन केले.

# जीवन का अमृत (भाग १)



कार्यरत सत्गुरु द्वारा उनकी बहुत कद्र की जाती है। मुझे खुशी है कि आपके पास जो कोई भी आता है, आप उसकी अधिक से अधिक सहायता करने की कोशिश करते हैं।

संसार में दो तरह के लोग होते हैं, पहले, जो सिमटकर अंतर्मुख हो सकते हैं और अंतर की महान शक्ति से प्रेरणा ले सकते हैं। दूसरे, जो पूजा के लिए बाहरी साधनों पर निर्भर रहते हैं, जैसे गिरजे या मंदिर। वे प्रकृति की महान ताकतों से प्रेरणा पाने की कोशिश करते हैं, जैसे सूर्य, चन्द्रमा, बर्फ से

### पूजा के तरीके

ढकी पहाड़ों की चोटियाँ, पवित्र नदियों का पानी, उन्हें संपूर्ण सृष्टि को चलाने वाली एक ही ताकत के अलग–अलग रूप मानकर ।

हर कोई, अपनी–अपनी श्रद्धा और एकाग्रता के अनुसार अपने पूजा के तरीके से कुछ–न–कुछ फायदा उठाता है, क्योंकि प्रकृति में कुछ भी नष्ट नहीं होता है और कोई भी कोशिश व्यर्थ नहीं जाती है ।

***

८. हृदय में सच्ची तड़प रखने वाले इंसान प्रभु की दया से, जिंदा सत्गुरु तक पहुँचा दिए जाते हैं। सत्गुरुओं की पवित्र शिक्षाएँ रचनात्मक होती हैं और उनका उद्देश्य सार्वभौमिक होता है।

हर किसी का इनमें स्वागत किया जाता है, बिना किसी रंग, जाति या देश के भेदभाव के ।

मैं सच के हर जिज्ञासु की सहायता करके प्रसन्न होऊँगा, जिनको कि प्रेम से पत्र लिखकर, मुझे अपनी खैरियत बताने के लिए कहा जा सकता है ।

***

९. मुझे जानकर खुशी हुई कि लोग खराब मौसम के बावजूद, महीने में

(क्रमशः)

**(कृपाल आश्रम, अहिल्यानगर)**

# चिरंतन प्रेमाकडे वाटचाल (नाती घट्ट विणू या)

चिरंतन प्रेमाकडे घेऊन जाण्याचे मंत्र

जेव्हा इतर लोक आपल्यावर टीका करतात तेव्हा त्यांचं मत नाकारून आपण स्वत:चा बचाव करू शकतो. पण जेव्हा आपण स्वतः टीका करतो तेव्हा मन ती टीका स्वीकारतं. स्वत:वर टीका केल्याने ऊर्जा कमी होते आणि त्यापासून आपण स्वत:चा बचाव करू शकत नाही. जेव्हा मन स्वत:बद्दल आणि इतरांबद्दल टीकात्मक विचार निर्माण करतं तेव्हा त्यांच्याकडे दुर्लक्ष करू नका किंवा ते टाळू नका. प्रत्येक विचाराची दखल घ्या आणि समजुतीने ते बदला. स्वत:वर टीका करण्यापासून ते स्वतःला प्रेरणा देण्यापर्यंत बदल घडवून आणा.

आपण जेव्हा चूक करतो आणि त्यासाठी स्वत:वर टीका करतो आणि स्वतः कमकुवत आहोत यावर शिक्कामोर्तब करतो तेव्हा, आपण स्वतःला कमकुवत राहण्याची आणि पुन्हा पुन्हा त्याच चुका करण्याची परवानगी देतो. स्वत:वर टीका केल्याने

### शक्तीशाली आत्मा

आत्म्याची शक्ती कमी होते. आपल्या चुकांची पुनरावृत्ती होऊ नये यासाठी शक्तीची गरज आहे. आपण सगळ्या चुका करूनही स्वतःला हे सांगत राहायला हवं – मी एक शक्तिशाली आत्मा आहे आणि पुढच्या वेळेस मी ही गोष्ट बरोबर करेन.

मीच आहे माझ्या संस्कारांचा शिल्पकार सुरेश ओबेरॉय : आपल्या चुकांनी आणि भूतकाळातील नकारात्मक कर्मांनी आपण बांधलेलो आहोत तर मग आपण स्वत:वर प्रेम कसं करणार ? शिवानीदीदी : वर्षानुवर्षं जर आपण एखाद्याचा तिरस्कार केला असेल आणि त्याच्या नकारात्मक गोष्टींवर फोकस केला असेल, तर त्या व्यक्तीवर प्रेम करणं सोपं नसेल. तटस्थ दृष्टिकोनातून स्वतःकडे दुसरी व्यक्ती म्हणून पाहा. आपल्याकडे चांगले गुण असूनही आपण नेहमी आपल्यातील उणिवांवर आणि आपल्या अपयशांवरच लक्ष केंद्रित केलं. त्यामुळे आपण स्वत:चा आदर आणि स्वत:वर प्रेम करू शकलो नाही. कालपरत्वे आपण स्वत:चा तिरस्कार करायला लागलो. आता आपल्या लक्षात आलं आहे की, जेव्हा आपण स्वत:चा तिरस्कार करतो तेव्हा आपण आपल्यातील प्रेमाच्या ऊर्जेत अडथळा आणतो. प्रचंड प्रमाणात तिरस्कार निर्माण केल्यामुळे आपण इतरांवर प्रेम ही करू शकत नाही. सुरेश ओबेरॉय : जेव्हा मी स्वतःवर चिडलेला, वैतागलेला असेन आणि त्याच वेळेस माझ्या कुटुंबातले इतर सदस्य माझ्या खोलीत असतील तर त्यांनाही अस्वस्थ वाटेल का?

शिवानीदीदी : काही घरांमध्ये गेल्यावर तिथली ऊर्जा खूपच नकारात्मक असल्याचं आपल्याला जाणवतं का? अशा ऊर्जेची लोकांना सवय होते ही वेगळी गोष्ट

(क्रमशः)

**(प्रजापिता ब्रम्हाकुमारी ईश्वरीय विश्व विद्यालय)**

## हसा आणि शतायुषी व्हा!

शिक्षक : सत्य आणि भ्रम यात काय फरक आहे सांगा पाहू?
पक्या : गुरुजी, तुम्ही जे शिकवत आहात ते सत्य आहे आणि आम्ही शिकत आहोत हा तुमचा भ्रम आहे

## करुया स्पर्धा परिक्षांची तयारी

* पिंक लेडीज क्लब २०२५ चे फुटबॉल स्पर्धेत भारतीय महिला संघाने कितवे स्थान मिळविले – ३ रे

**– अरविंद ब्राम्हणे,** भिंगार मो. ९४०३७३४२८१

# आहारवेद – आरोग्य संवर्धन

## डाळींब

१४) हृदय बळकट करण्यासाठी डाळिंबाच्या रसात केशर, लालगूळ व विलायची घालून त्याचे करावे व रोज थोडे थोडे प्यावे. यामुळे हृदयाच्या रक्तवाहिन्यांतील अडथळा दूर होऊन रक्ताभिसरण क्रिया सुधारते.

१५) डाळिंबाच्या सालीचा तुकडा तोंडात ठेवून त्याचा रस चोखल्याने जुनाट खोकला नाहीसा होतो.

१६) डाळिंबाचे दाणे वाटून त्याचा रस काढून जायफळ, सुंठ, लवंगपूड घालून त्यात मध घालावा व तयार झालेला रस दोन–दोन चमचे तीन वेळा प्यायल्यास पोटदुखी, आम्लपित्त, गॅस हे आजार कमी होतात.

सावधानता :

डाळिंबामध्ये औषधी गुणधर्म खूप आहेत. त्यामुळे कच्चे, पिकलेले सर्व प्रकारचे डाळिंब शरीराला उपयुक्त आहे. फक्त डाळिंब खाण्यापूर्वी त्याची साल स्वच्छ धुऊन घ्यावी. कारण कीड लागू नये, म्हणून त्यावर कीटकनाशकांचा वापर केलेला असतो.

डाळिंब सोलल्यानंतर त्याचे दाणे लगेचच खावेत. उशिरा खाल्ल्यानंतर त्यातील पोषक घटकांचे प्रमाण कमी होते. त्याचप्रमाणे स्वाद व चवही कमी होते.

सुकामेवा हा सहसा कठीण कवचाची फळे, बियांपासून बनविला जातो. ही फळे, बिया शक्तिदायक व उत्साहवर्धक असल्यामुळे मानवाचे शारीरिक व मानसिक आरोग्य सुदृढ राहण्यासाठी त्याचा उपयोग होतो. शुष्क बी खूप शक्तिशाली असते. ती जरी शुष्क, टणक व निर्जीव भासत असली, तरी ती जमिनीच्या खाली रोवल्यास व योग्य प्रमाणात पाणी दिल्यास तिलाच अंकुर फुटून पुढे मोठा वृक्ष निर्माण होऊन अनेक ठा–फुलांची निर्मिती करण्याची ताकद तिच्यामध्ये असते. अशाप्रकारे छोट्या स्वरूपात दिसणाऱ्या टणक बीमध्ये अनेक सकस अन्नमूल्ये व पौष्टिक घटक आहेत, की ज्याद्वारे मानव स्वतः ची रोगप्रतिकारक शक्ती वाढवून आजारांना दूर ठेवू शकतो.

फळा–

बदाम, काजू, शेंगदाणे, पिस्ता, अक्रोड, नारळ या सर्वांना एक किंवा दोन कठीण आवरणे असतात. या आवरणांमुळे आतील बी सुरक्षित राहते व त्यातील पौष्टिक घटक अबाधित राहतात. या कठीण आवरणांमुळे आतील बी किंवा फळाला कीड लागत नाही. म्हणून ज्या वेळेस या पदार्थाचा खाण्यासाठी वापर करावयाचा आहे त्याच वेळेस ते फोडावेत. यामुळे जास्तीत जास्त अन्नमूल्यद्रव्ये शरीरास मिळतात.

(क्रमशः)

**डॉ. शारदा निर्मळ–महांडुळे**
दुर्वांकुर वंध्यत्व निवारण व गर्भसंस्कार सेंटर
अहिल्यानगर
मोबाईल नं– ८७९३४००४००



स्पर्धा परीक्षेत सरस्वती प्राथमिक विद्यामंदिर केडगावची गरुडभरारी घेतली.

# सरस्वती प्राथमिक विद्यामंदिरची स्पर्धा परीक्षेत गरुडभरारी

## राज्य, जिल्हा व केंद्र पातळीवर विद्यार्थ्यांचे घवघवीत यश ११ विद्यार्थी गुणवत्ता यादीत

केडगाव – सरस्वती प्राथमिक विद्यामंदिर, केडगाव येथील इयत्ता पहिली ते चौथीच्या विद्यार्थ्यांनी सन २०२५–२६ मधील मंथन राज्यस्तरीय, स्टुडन्ट टॅलेंट सर्च व लक्ष्यवेध प्रज्ञाशोध स्पर्धा परीक्षांमध्ये उल्लेखनीय यश संपादन करत शाळेचा नावलौकिक उंचावला आहे. या स्पर्धांमध्ये तब्बल ११ विद्यार्थी गुणवत्ता यादीत झळकले असून राज्य, जिल्हा व केंद्र स्तरावर मानांकित क्रमांक पटकावले आहेत.

इयत्ता पहिलीतील चि. देवांश महेश जाधव यांनी मंथन राज्यस्तरीय परीक्षेत १३४/१५० गुणांसह जिल्ह्यात चौथा, तर स्टुडन्ट टॅलेंट सर्चमध्ये १३८/१५० गुणांसह सहावा क्रमांक मिळवला. कु. सृष्टी श्रीकांत जाधव हिने लक्ष्यवेध प्रज्ञाशोध परीक्षेत १२६/१५० गुणांसह केंद्रात प्रथम क्रमांक पटकावला.

इयत्ता दुसरीतील कु. आराध्या सोमनाथ जाधव हिने लक्ष्यवेध प्रज्ञाशोध परीक्षेत १४६/१५० गुणांसह राज्यात तिसरा, स्टुडन्ट टॅलेंट सर्चमध्ये १४०/१५० गुणांसह जिल्ह्यात पाचवा, तर मंथन परीक्षेत १३०/१५० गुणांसह केंद्रात प्रथम क्रमांक मिळवून त्रिसूत्री यश मिळवले. कु. श्रेया संजय मरकड हिने लक्ष्यवेधमध्ये जिल्ह्यात चौथा व मंथनमध्ये केंद्रात पाचवा क्रमांक मिळवला. कु. आरोही राहुल माताडे हिने मंथनमध्ये केंद्रात आठवा क्रमांक पटकावला. कु. ईश्वरी सागर कोठुळे हिने स्टुडन्ट टॅलेंट सर्चमध्ये जिल्ह्यात पाचवा, लक्ष्यवेधमध्ये केंद्रात तिसरा व मंथनमध्ये केंद्रात नववा क्रमांक मिळवला. कु. अंजली नवनाथ मळेकर हिने लक्ष्यवेध परीक्षेत केंद्रात प्रथम क्रमांक मिळवला.

इयत्ता तिसरीतील कु. लावण्या राजू बोरगे हिने मंथनमध्ये केंद्रात द्वितीय व लक्ष्यवेधमध्ये प्रथम क्रमांक मिळवून दुहेरी यश मिळवले. कु. स्वराली समीर कुलकर्णी हिने लक्ष्यवेध परीक्षेत केंद्रात चौथा क्रमांक मिळवला.

इयत्ता चौथीतील चि. कार्तिक अतुल सोनवणे याने मंथनमध्ये केंद्रात सहावा व लक्ष्यवेधमध्ये दुसरा क्रमांक मिळवला. चि. श्लोक संजय मरकड याने मंथन परीक्षेत केंद्रात नववा क्रमांक मिळवला.

विद्यार्थ्यांना शाळेचे मुख्याध्यापक संदीप भोर यांचे मार्गदर्शन लाभले. तसेच सौ. वैशाली घोरपडे, सौ. नंदा भोर, सौ. मनीषा वाळके, सौ. मीना जाधव यांनी विद्यार्थ्यांना परिश्रमपूर्वक मार्गदर्शन केले.

यशस्वी विद्यार्थ्यांचे, शिक्षकांचे व पालकांचे शाळेचे मुख्याध्यापक संदीप भोर, संस्थेचे अध्यक्ष दादाराम ढवाण, कार्यवाह प्रा. सोमनाथ दिघे, कोषाध्यक्ष डॉ. रावसाहेब पवार, सहकार्यवाह प्रा. रविंद्र चोभे व संस्थाचालकांनी अभिनंदन केले.

# प्रेरणादायी अक्षरधन

## मानवी मन आणि विश्वमन

श्रीमद्भगवतगीतेच्या तेराव्या अध्यायातील पाचव्या श्लोकातील 'इंद्रियाणी दशैकं' या विषयावर चिंतन करताना त्या दहाही इंद्रियांबरोबर अकरावे मन कसे आहे हे स्पष्ट केले आहे. नाथांनीही भागवतात,


अकरा इंद्रियामाजी जाण।
मन ते एक करण।

अकरा इंद्रियामधील मन हे सर्वांत महत्त्वाचे इंद्रिय आहे असे म्हटले आहे. ते प्रकृतीचे मूळ आहे. कामालाही त्याचे बळ आहे. हेच मन अहंकाराला चेतविते, इच्छेला वाढविते, आशेला चढविते आणि भयाचे रक्षण करते, मन द्वैत उत्पन्न करते. आपल्या संकल्पनेने सृष्टी बनविते तसेच विकल्पाने मोडते तर ती मनोरथाच्या उतरंडी उतरवते आणि रचते. बुद्धिचे दारही ते कधी कधी झाकते. त्याला मनोव्यापार म्हणतात. मनाने एवढा उद्योग केला असला तरी मानवी जीवनाच्या कल्याणाचा मार्गही मनालाच गवसतो. मनच प्रकृतीला संस्कृतीकडे नेते आणि माणसालाही देव बनविते. संत एकनाथांनी मनाला मनाजी पाटील देहगावीचा असे संबोधले आहे. गावावर नियंत्रण पाटलाचे तसे देहावर नियंत्रण मनाचे. मन हे देहगावचा पाटील आहे. हा पाटील विवेकी असल्यास देहगावी सदाचाराचा व्यापार होईल. मानवी मन हे देहालाही व्यापून ठेवते. त्या मनाचे १) व्यक्त मन आणि २) अव्यक्त मन असे दोन भाग असतात. माणसाचे व्यक्त मन त्याच्या मीपणाभोवती केंद्रित असते तर अव्यक्त मनात खूपच संस्कार साठविलेले असतात. माणसाला मन असते तसेच विश्वाला व्यापून टाकणारे आणखी एक मन असते. त्याला विश्वमन असे म्हणतात. हे विश्वमन ईश्वरासारखे समग्र, सूक्ष्म, सर्वज्ञ आणि सर्वशक्तिमान असते. माणसाचे मन हे विश्वमनाची एक आवृत्ती आहे.

मानवी मन शून्यातून विश्व निर्माण करते. त्यात सुखदुःखाचे अनेकविध रंग भरते. असंग आणि सत्संग अशा दोन्ही अवस्थावर मन वावरत असते. समर्थ रामदास स्वामींनी मनाच्या श्लोकातून असंगाला सत्संग बनविण्याची कला मानवी जगाला दिली. एकीकडे मन हे अशांतीचे मूळ आहे हे समर्थांनी जाणले. अशा मनापासून मुक्त होण्यासाठी मनाचाच कसा उपयोग करून घ्यावा; याचा मनोबोध म्हणजे मनाचे श्लोक होय. समर्थ मनाला 'मना सज्जना' म्हणून संबोधतात. सदाचारी प्रवृत्तीबोधाचा उपदेश करतात. जगात सत्याइतके मोठे काही नाही. सत्यत्व येणे, सत्यत्व रुजणे आणि सत्यत्व मांडणे, हे सत्यरूप मन पाठीशी खंबीरपणे उभे असणाऱ्या वाणीलाच शक्य होईल. संस्कारक्षम मनच नीती अनीतिच्या द्वंद्वातून विवेकाला उभे करते. त्यातूनच सामाजिक स्वरूपातही संस्कार्य उभे राहते. हीच मानवी मन आणि विश्वमन यांची एकरूपता असते.

– किशोर गांधी

# अहिल्यानगर जिल्ह्यातील विनोद वाडेकर यांना पद्मश्री डॉ. मणिभाई देसाई राष्ट्रसेवा पुरस्कार'



नगर – जिल्ह्यातील निवृत्त कृषी पर्यवेक्षक तथा उप कृषी अधिकारी विनोद वाडेकर यांना त्यांच्या उल्लेखनीय कृषि सेवा व सामाजिक कार्याबद्दल पद्मश्री डॉ मणिभाई देसाई राष्ट्रसेवा पुरस्कार २०२६ जाहीर करण्यात आला आहे. पद्मश्री डॉ. मणिभाई देसाई प्रतिष्ठान, निती आयोग भारत सरकार संलग्नित व राष्ट्रसेवा समिती महाराष्ट्र राज्य यांचे वतीने हा पुरस्कार प्रदान करण्यात येत आहे.

विनोद वाडेकर यांनी सामाजिक बांधिलकी, समाजसेवा व कृषी क्षेत्रात निस्वार्थपणे कार्य करत समाजासाठी आदर्श निर्माण केला आहे. त्यांच्या सेवाभावी वृत्तीमुळे समाजात सकारात्मक बदल घडवून आणण्यात त्यांनी महत्त्वपूर्ण योगदान दिले आहे. समाजासाठी वधु वर सोयरिक ग्रुपच्या माध्यमातून त्यांची मोफत आगळी वेगळी सम ाजसेवा निस्वार्थपणे गेली अनेक वर्ष अव्याहतपणे चालू आहे. कृषी विभागात कार्यरत असताना त्यांनी उत्कृष्ट सेवा बजावली असून त्यांचे कार्यकाळात अनेक उपक्रम राबवून शेतकरी व समाजहित साधले आणि आता निवृत्तीनंतरही त्यांनी हा शेतकरी सेवेचा वसा अखंडपणे चालू ठेवला आहे. त्यांच्या या सातत्यपूर्ण व समर्पित कार्याची दखल घेत त्यांना हा प्रतिष्ठेचा राष्ट्रीय स्तरावरील पुरस्कार जाहीर करण्यात आला आहे.

सदर पुरस्कार २७ एप्रिल रोजी सायंकाळी ६ ते ८ या वेळेत क्रांतिज्योती सावित्रीबाई फुले स्मारक सभागृह, भवानी पेठ, पुणे येथे मॅगसेसे पुरस्कार विजेते, पद्मश्री डॉ. मणिभाई देसाई यांच्या जयंतीनिमित्त विविध क्षेत्रात निरपेक्षपणे व समर्पित भावनेने कार्य करणाऱ्या कार्यकर्त्यांचा गौरव या कार्यक्रमात करण्यात येणार आहे. पुरस्कार वितरण सोहळ्यास राज्याचे खादी आणि ग्रामोद्योग मंत्री रविंद्र साठे यांचे हस्ते होणार असून विविध क्षेत्रात कार्य करणाऱ्या अनेकांची उपस्थित राहणार आहे

# नवदृष्टी मिळालेले मतदार बजावणार मतदानाचे हक्क

## फिनिक्स फाउंडेशनची जागृती



नगर – फिनिक्स सोशल फाउंडेशनच्या वतीने मोफत नेत्र तपासणी शिबिर व मोतीबिंदू शस्त्रक्रियेच्या माध्यमातून नवदृष्टी मि ळालेल्या ज्येष्ठ नागरिक व महिलांना मतदानाचे कर्तव्य बजावण्याचे आवाहन करण्यात आले. राहुरी पोटनिवडणुक आणि पुढील जिल्हा परिषद निवडणुकांमध्ये देखील मतदानाचा हक्क बजावून सक्षम उमेदवार निवडून देण्याचे स्पष्ट करण्यात आले. राहुरी पोटनिवडणुकीत ज्या गावात शंभर टक्के मतदान होईल त्या ग्रामपंचायतला संस्थेच्या वतीने ५१ हजार रुपयाचे बक्षीस देऊन सन्मान केला जाणार असल्याची माहिती फिनिक्सचे संस्थापक जालिंदर बोरुडे यांनी दिली.

फिनिक्स सोशल फाउंडेशनने मोफत नेत्र तपासणी शिबिराबरोबरच सामाजिक बांधिलकी जपत एक आगळा-वेगळा मतदार जागृतीचा उपक्रम हाती घेतला आहे. नागरदेवळे (ता. नगर) येथे नुकतेच आयोजित करण्यात आलेल्या या मोफत नेत्र तपासणी व शस्त्रक्रिया शिबिरास महिलांसह ज्येष्ठ नागरिकांचा प्रतिसाद लाभला. या शिबिराच्या माध्यमातून मोतीबिंदू व काचबिंदूग्रस्त रुग्णांची तपासणी करून, त्यांची मोफत शस्त्रक्रिया पुणे येथील के. के. आय. बुधराणी रुग्णालयात यशस्वीरीत्या करण्यात आली. शस्त्रक्रियेनंतर दृष्टी परत मिळालेल्या रुग्णांचे शहरात आगमन होताच फिनिक्स सोशल फाउंडेशनच्या वतीने त्यांचे स्वागत करण्यात आले.

जालिंदर बोरुडे यांनी नवदृष्टी मिळालेल्या ज्येष्ठ नागरिकांशी संवाद साधत, या नव्या दृष्टीचा उपयोग केवळ स्वतःच्या जीवनातच नव्हे, तर लोकशाही बळकट करण्यासाठी मतदानाचा हक्क बजावण्यासाठीही करावा, असे आवाहन केले. मतदान हा प्रत्येक नागरिकाचा अधिकार आणि राष्ट्रीय कर्तव्य आहे. नवदृष्टीतून चांगला, प्रामाणिक आणि विकासाभिमुख उमेदवार निवडण्यासाठी सर्वांनी मतदान करावे, असे त्यांनी सांगितले.

यावेळी उपस्थित ज्येष्ठ नागरिक व महिलांनीही मिळालेल्या नवदृष्टीतून योग्य उमेदवाराची निवड करून मतदानाचा हक्क बजावण्याचा निर्धार व्यक्त केला. आर्थिकदृष्ट्या दुर्बल घटकातील दृष्टीहीन व अल्पदृष्टीग्रस्त रुग्णांना दृष्टी मिळावी, यासाठी फिनिक्स सोशल फाउंडेशनने जिल्हाभरात एक व्यापक सामाजिक चळवळ उभी केली आहे. या उपक्रमांतर्गत सर्वसामान्य नागरिकांसाठी नियमितपणे मोफत नेत्र तपासणी शिबिरे तसेच मोतीबिंदू व काचबिंदूच्या मोफत शस्त्रक्रिया आयोजित करण्यात येतात. आरोग्यसेवेबरोबरच मतदार जागृती करण्याच्या हेतूने फिनिक्स सोशल फाउंडेशनच्या माध्यमातून हा उपक्रम राबविण्यात येत असल्याची माहिती बोरुडे यांनी दिली.

# अनामप्रेम हिंमतभवनात दिव्यांगांसाठी हेल्पलाइनचा शुभारंभ

## 'प्रकाशवाटा' व एमएस–सीआयटी उपक्रमांचे लोकार्पण



गांधी मैदानावरील अनामप्रेम संस्थेच्या हिंमतभवन प्रकल्पात अक्षय तृतीयेच्या मुहूर्तावर 'प्रकाशवाटा' या ब्रेल मासिकाचे लोकार्पण झाले.

नगर – अहिल्यानगरच्या पावन भूमीत, गांधी मैदानावरील अनामप्रेम संस्थेच्या हिंमतभवन प्रकल्पात अक्षय तृतीयेच्यामुहूर्तावर एक नवे, प्रेरणादायी पर्व उजाडले. दिव्यांग विद्यार्थ्यांच्या सक्षमीकरणासाठी समर्पित असलेल्या या संस्थेने 'प्रकाशवाटा' या ब्रेल मासिकाचे लोकार्पण, दिव्यांगांसाठी समर्पित हेल्पलाइनची सुरुवात आणि संगणक साक्षरतेकडे नेणाऱ्या एम एस–सीआयटी कोर्सचा शुभारंभ अशा तीन महत्त्वपूर्ण उपक्रमांचे उद्घाटन उत्साहात साजरे केले.

कार्यक्रमाची सुरुवात मानवतेचा दीप प्रज्वलित करणाऱ्या लुईस ब्रेल, अदम्य जिद्दीचे प्रतीक हेलन केलर, तसेच समाजसेवेचे जीवनमंत्र जगणारे डॉ. बाबा आमटे आणि साधनाताई आमटे यांच्या प्रतिमांचे पूजन व पुष्पहार अर्पण करून करण्यात आली. या प्रसंगी सभागृहात एक स्फूर्तिदायी वातावरण निर्माण झाले होते. अनामप्रेम प्रकाशगान संगीत रजनी मंचच्या कलाकारांनी सादर केलेल्या सुरेल स्वागतगीताने कार्यक्रमाला भावस्पर्शी सुरुवात मिळाली.

संस्थेचे अध्यक्ष इंजि. अजित माने, डॉ. मेघना मराठे आणि अभय रायकवाड यांच्या प्रमुख उपस्थितीत हा सोहळा अधिकच उजळून निघाला. कार्यकर्ते, विद्यार्थी आणि लाभार्थी यांच्या सहभागाने कार्यक्रमाला जिवंतपणा लाभला.

आपल्या मनोगतात डॉ. मेघना मराठे यांनी 'प्रकाशवाटा' या मासिकाचे महत्त्व अधोरेखित करताना सांगितले की, आजच्या वेगवान व स्पर्धात्मक युगात नव्या तंत्रज्ञानाच्या साहाय्याने साकारलेले हे ब्रेल मासिक दिव्यांग विद्यार्थ्यांसाठी ज्ञानाचा दीपस्तंभ ठरणार आहे. विद्यार्थ्यांनी या माध्यमातून स्वतःला घडवून उज्ज्वल भविष्याकडे वाटचाल करावी, असे त्यांनी आवर्जून सांगितले.

इंजि. अजित माने यांनी हेल्पलाइन उपक्रमाविषयी सविस्तर माहिती देताना सांगितले की, ९०११९ ४६८६८ ही हेल्पलाइन सेवा दिव्यांग बांधवांसाठी आशेचा किरण ठरणार आहे. रोजगार मार्गदर्शन, शिक्षण व प्रशिक्षण, स्पर्धा परीक्षा तयारी तसेच वैयक्तिक अडचणींवर समुपदेशन या सर्व सुविधा एका छताखाली उपलब्ध होणार आहेत. समुपदेशक श्रीमती दीप्तीताई सोंदे व सौ. संगीता सुसर या त्यांच्या प्रभावशाली शैलीत समुपदेशनाचे काम करणार आहेत. यासोबतच 'प्रकाशवाटा' मासिकाचा लाभ घ्यावा आणि एमएस–सीआयटी कोर्सद्वारे संगणक साक्षरतेकडे वाटचाल करावी, असेही त्यांनी आवाहन केले. यावेळी या हेल्पलाइनवर आलेल्या एका दिव्यांग विद्यार्थ्यांच्या समस्येचे निराकरण देखील त्वरित करण्यात आले.

कार्यक्रमात वसतिगृहातील विद्यार्थी परमेश्वर सुपेकर आणि द्वारका जोरवर यांनी 'प्रकाशवाटा' मासिकाचे प्रभावी वाचन सादर करून उपस्थितांच्या मनाचा ठाव घेतला. त्यांच्या आवाजातून उमटलेले शब्द जणू प्रत्येकाच्या अंतःकरणाला स्पर्श करून गेले. तसेच विद्यार्थ्यांच्या हस्ते एमएस–सीआयटी कोर्सचे नारळ वाढवून उद्घाटन करण्यात आले, ही क्षणचित्रे सर्वांसाठी अविस्मरणीय ठरली.

या यशस्वी कार्यक्रमासाठी संस्थेचे कार्यकर्ते प्रकाश गजे, विशाल निंबाळकर, माधवी सैंदाणे, कल्पना कदम, अमृत भुसारी आणि सचिन गारदे यांनी अथक परिश्रम घेतले. कार्यक्रमाचा समारोप विद्यार्थी अविनाश कोळेकर यांच्या मनोगतपूर्ण आभार प्रदर्शनाने झाला.

दिव्यांग विद्यार्थ्यांच्या आयुष्यात स्वावलंबनाची नवी उमेद जागवणारा, आधुनिक शिक्षणाची दिशा दाखवणारा आणि आत्मविश्वासाची ज्योत प्रज्वलित करणारा हा उपक्रम खऱ्या अर्थाने समाजासाठी प्रेरणादायी ठरत आहे. अनामप्रेम संस्थेने आज पुन्हा एकदा सिद्ध केले की, जिद्द, संवेदना आणि योग्य दिशा मिळाल्यास कोणतीही वाट अडथळ्यांची राहत नाही–ती 'प्रकाशवाटा' बनते.





सनातन धर्मसभा गायत्री मंदिर अहिल्यानगरच्या शंकराचार्य जयंती निमित्ताने सामुदायिक (उपनयन) मुंजीचा कार्यक्रम आयोजित केला होता. शंकराचार्य यांच्या प्रतिमेस खजिनदार उमेश नगरकर यांच्या हस्ते पुष्पहार अर्पण करून अभिवादन करण्यात आले. यावेळी मंत्री दिनकर देशमुख, उपाध्यक्ष डॉ.नंदकिशोर मुळे, वे.मू.पं.चकोर मुळे, वे.मू.उमेश वाळुंजकर, वे.मू. निलेश धर्माधिकारी, वे.मू.बंडोपंत धर्माधिकारी, अनंत देशपांडे, समीर उपाध्ये आदी. (छाया – उदय जोशी)

# सनातन धर्मसभा गायत्री मंदिरतर्फे शंकराचार्य जयंती साजरी

नगर – सनातन धर्मसभा गायत्री मंदिर अहिल्यानगरच्या वतीने दरवर्षीप्रमाणे यंदाही शंकराचार्य जयंती निमित्ताने सामुदायिक (उपनयन) मुंजीचा कार्यक्रम आयोजित केला होता. शंकराचार्य यांच्या प्रतिमेस खजिनदार उमेश नगरकर यांच्या हस्ते पुष्पहार अर्पण करून अभिवादन करण्यात आले. यावेळी मंत्री दिनकर देशमुख, उपाध्यक्ष डॉ. नंदकिशोर मुळे, वे.मू.पं.चकोर मुळे, वे.मू.उमेश वाळुंजकर, वे.मू.निलेश धर्माधिकारी, वे.मू.बंडोपंत धर्माधिकारी, अनंत देशपांडे, समीर उपाध्ये आदी उपस्थित होते.

१२३८वी जयंती वैदिक पद्धती नुसार वेदमंत्रांचा जागर करुन साजरी करण्यात आली. या प्रसंगी सनातन धर्मसभेचे खजिनदार ॲड.उमेश नगरकर यांनी सनातन धर्मसभेची माहिती देताना सांगितलं की सदरहू संस्था गत १२० वर्षापासून धार्मिक कार्यक्रमांचे आयोजन करत आहे त्यामधे शंकराचार्य जयंती निमित्त सामुदायिक उपनयन मौंजीबंधन हे एक आहे. मुलांवर मौंजीचा संस्कार व्हावा त्यायोगे सक्षम नवीन पिढि तयार व्हावी हा शुद्ध हेतू मनी बाळगून सनातन धर्मसभा दरवर्षी हे धार्मिक आयोजन करत असते. या प्रसंगी शंकराचार्य प्रतिमा पूजन मंत्रजागर पठण करण्यात आले. सर्व संचालक मंडळांनी नूतन उपनीत बटूला शुभाशिर्वाद दिले तसेच उपनीत बटूच्या उज्ज्वल भवितव्यासाठी शुभमंगल कामना शुभेच्छा दिल्या व या सनातन धर्मसभेच्या कार्यक्रमास उपस्थित राहिल्याबद्दल सर्वांनी केलेल्या सहकार्याबद्दल कृतज्ञता आभार व्यक्त केले. भोजनप्रसादाने कार्यक्रमाची सांगता झाली. यावेळी ज्ञाती बांधव उपस्थित होते.



दहावीच्या सीबीएसई परीक्षेत ९९.२० टक्के गुण मिळवून शाळेत प्रथम आल्याबद्दल स्नेहांशु दोमल याचा सत्कार करण्यात आला.

# स्नेहांशु दोमल याचा सत्कार

नगर – शहरातील विठ्ठलवाडी–वाघमळा, बालिकाश्रम रोड येथील रहिवाशी स्नेहांशु संतोष दोमल यांनी दहावीच्या सीबीएसई दिल्ली बोर्ड परीक्षेत ९९.२०% गुण घेत चैतन्य टेक्नो स्कूलमध्ये पहिला नंबर मिळविला. या निमित्ताने भैरवनाथ मंडळाच्या वतीने स्नेहांशु संतोष दोमल याचा सत्कार करताना कचरु पाडळे, महेश ढाणके, दत्तात्रय भगत, विलास पाडळे, शंकर नागूल, बाबासाहेब ससे, शेखर नागूल, पंकज ससे, ऋषिकेश ससे, अनिस पाडळे, जयेश श्रीगादी, अभिषेक दौंडकर, मनोज पाडळे, विशाल नागूल, चेतन नागूल, बाळासाहेब नागूल, भैरवनाथ मंडळाच्या कार्यकर्ते उपस्थित होते.

मालक, मुद्रक, प्रकाशक, संपादक सुभाष चंदनमल गुंदेचा यांनी नवा मराठा मुद्रणालय, आचार्य गुंदेचा चौक, अहिल्यानगर येथे हे पत्र छापून येथेच प्रसिद्ध केले.

# डॉ.कुमार विश्वास हे केवळ कवी नसून आध्यात्मिक आणि सामाजिक प्रबोधन करणारे वक्ते : वसंत लोढा

## पंडित दीनदयाळ परिवार प्रतिष्ठानच्या वतीने सत्कार



डॉ.कुमार विश्वास यांची पंडित दीनदयाळ परिवार प्रतिष्ठानच्या वतीने सदिच्छा भेट घेऊन सत्कार करताना वसंत लोढा आदी.

नगर – अपने अपने राम आणि अपने अपने श्याम यांसारख्या कार्यक्रमांच्या माध्यमातून भगवान राम आणि श्रीकृष्णांच्या जीवनावर आधारित जीवन व्यवस्थापन आणि समाज व्यवस्थापनावर हिंदी कवी, लेखक डॉ.कुमार विश्वास हे व्याख्याने देत आहेत. त्यांच्या कथा आणि व्याख्याने तरुणांना जीवन जगण्याची नवी दृष्टी आणि प्रेरणा देणारी मानली जातात थोडक्यात सांगायचे तर, डॉ. विश्वास हे केवळ कवी नसून आता एक आध्यात्मिक आणि सामाजिक प्रबोधन करणारे वक्ते म्हणून ओळखले जातात, असे प्रतिपादन दीनदयाळ परिवार प्रतिष्ठानचे संस्थापक वसंत लोढा यांनी केले आहे.

डॉ.कुमार विश्वास यांची पंडित दीनदयाळ परिवार प्रतिष्ठानच्या वतीने सदिच्छा भेट देऊन सत्कार करण्यात आला. याप्रसंगीवसंत लोढा, सचिव बाळासाहेब भुजबळ, कार्याध्यक्ष सुरज अग्रवाल, अशोक कानडे, राहुल जामगावकर, निलेश चिपाडे, विश्व हिंदू परिषदेचे माजी जिल्हा मंत्री गजेंद्र सोनवणे, इंजिनीयर विजयकुमार पादीर आदी उपस्थित होते.

सत्काराला उत्तर देताना डॉ.कुमार विश्वास म्हणाले, पंडित दीनदयाळ परिवार प्रतिष्ठानच्या सत्काराने मी भारावून गेलो आहे. पंडित दीनदयाळ परिवार प्रतिष्ठानच्या वतीने अहिल्यानगर शहरात व्याख्यानमालेच्या माध्यमातून सांस्कृतिक चळवळ चालविली जात आहे. ही व्याख्यानमाला तरुणाईला वैचारिक बळ देणारी आहे. या व्याख्यानमालेला माजी केंद्रीय मंत्री सुब्रमण्यम स्वामी, केरळचे राज्यपाल आरिफ मोहम्मद खान, केरळचे राज्यपाल राजेंद्र आर्लेकर, विश्वास नांगरे पाटील, सत्यपाल सिंह, फैज खान, ॲड.उज्वल निकम, विश्वास नांगरे पाटील, माधवी लता यांच्यासारखे दिग्गज वक्ते या व्याख्यानमालेला उद्बोधन करण्यासाठी येऊन गेले आहेत. व्याख्यानमालेच्या माध्यमातून देशातील सामाजिक व राजकीय प्रश्नांना वाचा फोडणारे व्यासपीठ निर्माण केले आहे. पंडित दीनदयाळ परिवार प्रतिष्ठानचे समाजप्रबोधनाचे कार्य कौतुकास्पद आहे.

यावेळी सुरज अग्रवाल यांनी आभार मानले.






इन्स्टिट्यूट ऑफ बिझनेस मॅनेजमेंट अँण्ड रूरल डेव्हलपमेंट, अहिल्यानगर येथे २१ एप्रिल रोजी विद्यार्थ्यांच्या रोजगारक्षमतेत वाढ करण्याच्या उद्देशाने प्री-प्लेसमेंट प्रशिक्षण सत्राचे यशस्वी आयोजन करण्यात आले. या सत्रासाठी उद्योग क्षेत्रातील अनुभवी तज्ज्ञ सुप्रियो बॅनर्जी यांना प्रमुख मार्गदर्शक म्हणून आमंत्रित करण्यात आले होते.

# आय बी एम आर डी मध्ये प्री-प्लेसमेंटचे यशस्वी प्रशिक्षण

नगर - इन्स्टिट्यूट ऑफ बिझनेस मॅनेजमेंट अँण्ड रूरल डेव्हलपमेंट, अहिल्यानगर येथे २१ एप्रिल रोजी विद्यार्थ्यांच्या रोजगारक्षमतेत वाढ करण्याच्या उद्देशाने प्री-प्लेसमेंट प्रशिक्षण सत्राचे यशस्वी आयोजन करण्यात आले.

या सत्रासाठी उद्योग क्षेत्रातील अनुभवी तज्ज्ञ सुप्रियो बॅनर्जी यांना प्रमुख मार्गदर्शक म्हणून आमंत्रित करण्यात आले होते. सत्राचा मुख्य उद्देश विद्यार्थ्यांना उद्योगक्षेत्रातील सध्याच्या अपेक्षा, भरती प्रक्रिया आणि आवश्यक कौशल्यांबाबत मार्गदर्शन करणे हा होता, ज्यामुळे शैक्षणिक ज्ञान आणि उद्योगातील प्रत्यक्ष गरजा यांतील दरी कमी करण्यास मदत होईल.

सत्रादरम्यान श्री. बॅनर्जी यांनी प्रभावी बायोडाटा तयार करणे, मुलाखत तंत्र, संवाद कौशल्ये आणि व्यावसायिक शिष्टाचार यांसारख्या महत्त्वपूर्ण विषयांवर सविस्तर मार्गदर्शन केले. त्यांनी बदलत्या व्यावसायिक वातावरणात आत्मविश्वास, लवचिकता आणि सातत्याने कौशल्यविकास यांचे महत्त्व अधोरेखित केले. प्रत्यक्ष जीवनातील उदाहरणे आणि अनुभवांच्या आधारे त्यांनी विद्यार्थ्यांना कार्यक्षेत्रातील अपेक्षा स्पष्टपणे समजावून सांगितल्या.

सत्र अत्यंत संवादात्मक स्वरूपाचे होते, ज्यामुळे विद्यार्थ्यांचा सहभाग दिसून आला. प्रश्नोत्तर सत्राद्वारे विद्यार्थ्यांना त्यांच्या करिअर, मुलाखत तयारी आणि कौशल्यविकासाबाबतच्या शंकांचे निरसन करण्याची संधी मिळाली. श्री. बॅनर्जी यांची स्पष्ट, सुबोध आणि प्रभावी मांडणी विद्यार्थ्यांना अत्यंत उपयुक्त ठरली.

एकूणच, हे सत्र विद्यार्थ्यांसाठी अत्यंत उपयुक्त व मार्गदर्शक ठरले. या सत्रामुळे विद्यार्थ्यांचा आत्मविश्वास वाढला तसेच येणाऱ्या प्लेसमेंट प्रक्रियेसाठी आवश्यक तयारीबाबत त्यांना व्यावहारिक दिशा मिळाली.

या प्रसंगी करियर एज कंपनीचे डायरेक्टर करण सरीन उपस्थित राहून विद्यार्थ्यांशी संवाद साधला. त्यांनी विद्यार्थ्यांच्या ज्ञान, कौशल्य आणि व्यावसायिक दृष्टीकोनाचे विशेष कौतुक केले.

आय बी एम आर डी चे संचालक डॉ. संजय धर्माधिकारी यांनी सांगितले की, अशा उपक्रमांमुळे विद्यार्थ्यांना उद्योग क्षेत्राशी थेट संपर्क साधण्याची आणि करिअर घडविण्याची संधी मिळते. संस्थेने भविष्यातही अशा उपक्रमांचे आयोजन करून विद्यार्थ्यांच्या सर्वांगीण विकासासाठी सातत्याने प्रयत्नशील राहण्याचा निर्धार त्यांनी व्यक्त केला. कार्यक्रमाचा समारोप औपचारिक आभार प्रदर्शनाने करण्यात आला, ज्यामध्ये सुप्रियो बॅनर्जी आणि करण सरीन यांचे मौल्यवान मार्गदर्शन आणि सहकार्याबद्दल मनःपूर्वक आभार मानण्यात आले.

या कॅम्पस ड्राईव्हचे आयोजन व समन्वयन ट्रेनिंग अँण्ड प्लेसमेंट सेल तर्फे करण्यात आले. या प्री-प्लेसमेंट प्रशिक्षण सत्राचे समन्वय डॉ. गणेश अंत्रे यांनी केले. सदर उपक्रम यशस्वीरीत्या पार पाडण्यासाठी डॉ. मुरारी शर्मा, डॉ. मेघा जैन, डॉ. नचिकेत देवधर तसेच डॉ. अमृता कुलकर्णी यांनी परिश्रम घेतले.

या कार्यक्रमास संस्थेचे अध्यक्ष राधाकृष्ण विखे पाटील, मुख्य विश्वस्त व सीईओ डॉ. सुजय विखे पाटील, सेक्रेटरी जनरल डॉ. पांडुरंग गायकवाड, मेडिकल कॉलेज व हॉस्पिटलचे संचालक डॉ. अभिजित दिवटे तसेच तांत्रिक संचालक सुनील कल्हापुरे या सर्वांचे सहकार्य आणि मार्गदर्शन लाभले.

## ते माझे घर...

ते माझे घर... जगावेगळे असेल सुंदर.. असेल सुंदर.... अशी खरंतर आपल्या प्रत्येकाची भावना आपल्या वास्तू बाबत असतेच. पण त्यातल्या त्यात नवीन बंगला किंवा फ्लॅट घेणाऱ्यांची अशी भावना जास्त प्रकर्षाने असते. आपल्या वास्तूतल्या अंतर्गत सजावटीला आपण जसे महत्व देतो, तसे बाह्य सजावटीवरही लक्ष देणे गरजेचे आहे. कारण वास्तु बाहेरून बघितल्यावरच कळते आणि आतून त्या वास्तूचे आणि पर्यायाने त्या वास्तुतल्या सदस्यांचे अंतरंग समजतात. अंतर्गत आणि बाह्य सजावटीसाठी बऱ्याच वेळेला लहान मोठ्या झाडांचा समावेश केला जातो. कधी कधी आपल्या वास्तुत लावलेले एखादे विशिष्ट झाड सुद्धा सगळ्यांना सांगून जाते की 'ते माझे घर'. वास्तुशास्त्रानुसार आपल्या भवना भोवती म्हणजेच बाह्य सजावट करताना काही ठराविक झाडांचा समावेश हा असलाच पाहिजे. मात्र ही झाडे लावायला वास्तु म्हणजेच प्लॉट जरा मोठा असेल तर अधिक चांगले. कारण कोणत्याही झाडाची सावली ही आपल्या भवनावर नको असा वास्तुशास्त्राचा नियम सांगितलेला आहे. ती सावली भवनावर ज्या दिशेतून पडते त्या दिशेशी संबंधित असलेली व्यक्ती ही कायम आजारी असते किंवा अडचणीत असते म्हणून झाड लावताना घरापासून म्हणजेच भवना पासून एका विशिष्ट अंतरावर लावणं हे गरजेचं आहे.

जसं पूर्व दिशेला वड किंवा चंदनाच्या झाडाची योजना शास्त्रात प्रतिष्ठित सांगितली जाते. दक्षिण दिशेला औदुंबर किंवा ते शक्य नसल्यास कडुलिंब, ख्रिसमस ट्री, साग म्हणजेच अधिक सावली देणारी वृक्ष संपदा असावी. पश्चिम दिशेला पिंपळ, पाम, निलगिरी अशा प्रकारची झाडे लावावीत. तर उत्तर दिशेला पालाश किंवा नित्य उपयोगी पडणारे मोगरा, गुलाब,झेंडू, डाळिंब, नागकेशर, महूआ, कदंब, नारळ इत्यादी झाडांची योजना करणे हितावह ठरते.

तसेच उपदिशांचा विचार करता आपल्या वास्तूच्या ईशान्य प्रभागात चंदन, चंपा, चमेली, नारळ, बेल यांची रचना करावी. तर अग्नेय प्रभागात नारळ, आंबा, केळ इत्यादी प्रकारच्या वृक्षांचा विचार करावा. नैऋत्य प्रभागात औदुंबर, ख्रिसमस ट्री, बदाम ट्री, साग अशी घनदाट पर्णव्यवस्था असणाऱ्या झाडांची रचना करता येते. वायव्य प्रभागात पिवळा किंवा पांढरा चाफा, बेल, नागवेली, गुळवेल किंवा नित्य वापरातल्या हलक्या सुवासिक झाडांची रचना करणे हितावह ठरते.

विदिशा वास्तूंच्या बाबतीत आपल्या भवना बाहेरील वृक्ष लागवड ही काळजीपूर्वक, नीट विचार करून करावी लागते. जेणेकरून अशा वास्तूतला ऊर्जेचा गोंधळ काही अंशी थोपवता येऊ शकेल.

एखादा सुज्ञ वास्तुतज्ञ वास्तुभोवतीच्या वृक्षसंपदेच्या नियोजनात अवकहडा चक्राचा वापर करून वास्तु- ज्योतिष ची योग्य सांगड घालून तुम्हाला उत्तम मनोकामना अवाक्यात आणून देऊ शकतो.

**- डॉ. कौस्तुभ काळे,** वास्तु वाचस्पती, अहिल्यानगर. ९८५०९४१८८१

# १२ व्या शतकात बसवेश्वरांनी सामाजिक समरसता साधली

## मिलिंद महाराज चवंडके यांचे प्रतिपादन



पंचवटीनगरमधील श्रीराम मंदिरात विश्व हिंदू परिषदेतर्फे आयोजित करण्यात आलेल्या महात्मा बसवेश्वर जयंती सोहळ्यात बोलताना मिलिंद महाराज चवंडके आदी.

नगर - महात्मा बसवेश्वरांनी १२ व्या शतकात सामाजिक समरसता साधण्याची धाडसी कामगिरी बजावली होती, असे प्रतिपादन विश्व हिंदू परिषदेचे नगर जिल्हा धर्माचार्य संपर्क प्रमुख मिलिंद महाराज चवंडके यांनी केले.

येथील भिस्तबाग चौकालगतच्या पंचवटीनगरमधील श्रीराम मंदिरात विश्व हिंदू परिषदेतर्फे आयोजित करण्यात आलेल्या महात्मा बसवेश्वर जयंती सोहळ्यात प्रवचन करताना ते बोलत होते. विहिंपच्या जिल्हा मातृशक्ती संयोजिका सौ.हिराताई शहापुरे यांनी स्वागत करून उपस्थितांचा परिचय करून दिला. महात्मा बसवेश्वर आणि भारतमातेच्या प्रतिमेचे पूजन करण्यात आले. विहिंपचे जिल्हा सहमंत्री राजेंद्र चुंबळकर यांनी त्रिवार ओंकार, एकात्मता मंत्र व विजय महामंत्र घेतला. विहिंपचे विभाग मंत्री सुनीलराव खिस्ती यांनी विश्व हिंदू परिषदेच्या कार्याची नेमकेपणाने माहिती दिली. विहिंपचे जिल्हा मंत्री अनिल जोशी, प्रखंड मंत्री विरेंद्र शिंदे, अभिषेक शहापुरे, आर. डी.शिदोरे, अशोक शहापुरे, मंगलताई गौरीधर, अलका वाघ, सौ.बंग, सौ.शिंदे, कुलकर्णी, भागवत, मंगल सांगोळे, सौ.अनिता आंबुरडे, लिलाबाई आंबुरडे यांच्यासह परिसरातील महिला, पुरुष व बालगोपाल उपस्थित होते.

### विश्व हिंदू परिषदेतर्फे महात्मा बसवेश्वर जयंती उत्साहात साजरी

मिलिंद महाराज चवंडके पुढे म्हणाले, कर्नाटकातील विजापूर जिल्ह्यातील बागेवाडी ही बसवेश्वरांची जन्मभूमी. निर्गुण निराकार देवाधिदेव महादेवांचीच श्रध्देने आराधना करा. गळ्यात शिवलिंग धारण करा. आपले शरीर हे चालते-बोलते शिवालय आहे ते सदैव पवित्र राहिल, याची काळजी घ्या. सदाचाराचे आचरण आणि नितीनियमांचे पालन करून पावित्र्य अनुभवा. खोटे बोलू नका. दुसऱ्यांची निंदा करू नका. कोणालाही दुखावू नका. मांसाहार करणे हे महापाप आहे त्यापासून कायम दूर रहा. कोणतेही व्यसन करू नका, असे मौलिक संदेश देत बसवेश्वरांनी बसवकल्याण येथे अध्यात्मिक प्रगती करणारांना समताधिष्ठित समाजाच्या निर्मितीसाठी अनुभव मंडपच्या माध्यमातून एकत्रित केले. कष्टकरी, दीनदलित, अठरा आलुतेदार, बारा बलुतेदार, वेगवेगळ्या जातीपातींचे स्त्री-पुरुष अशा सर्वांचे अनुभव मंडप मध्ये अध्यात्मावर चिंतन घडू लागले. महिलांना मान दिला गेला. अनुभव मंडप जगातील ही पहिली संसद ठरली. पंतप्रधान नरेंद्र मोदी यांनी या अनुभव मंडपचा भारतीय संसदीय लोकशाहीचा आधारस्तंभ, अशा शब्दांत गौरव केला आहे.

कायक वे कैलास म्हणजे श्रम हाच ईश्वर हा मूलमंत्र बसवेश्वरांनी दिला. श्रमाला मानाचे स्थान प्राप्त करून देताना प्रामाणिक कार्य हाच स्वर्ग असे सांगितले. अंधश्रद्धा, अस्पृश्यता विरोधात प्रखर संघर्ष उभारला.

समता, समानता, सामाजिक समरसता, बंधूता, एकता, एकात्मता, स्वातंत्र्य, विधवा पुनर्विवाह, महिला सक्षमीकरण यासाठी १२ व्या शतकात बसवेश्वरांनी केलेले कार्य आजही प्रेरणा देते. त्यांचे प्रेरणादायी विचार वचन साहित्याच्या माध्यमातून आपल्यासमोर दीपस्तंभाप्रमाणे आहेत.

बसवेश्वरांच्या विचाराने केलेली क्रांती कल्याण क्रांती म्हणून ओळखली जाते. दक्षिण भारत आणि उत्तर भारत मध्ये या क्रांतीचा कायम प्रभाव राहिला. बसवेश्वरांच्या सर्वस्पर्शी कार्यामधून प्रेरणा घेऊन जीवनाचा आनंद लुटा, असे आवाहन मिलिंद महाराज चवंडके यांनी केले.

बसवेश्वरांबद्दल इतके अभ्यासपूर्ण प्रवचन प्रथमच ऐकायला मिळाले, अशा प्रतिक्रिया उपस्थित श्रोत्यांमधून उत्स्फूर्तपणे उमटल्या. शांतीमंत्र आणि राष्ट्रीय उद् घोषाने कार्यक्रमाची सांगता करताना प्रसाद वाटपही करण्यात आले.



ग्रामदैवत श्री विशाल गणेश मंदिरात अक्षय तृतीयानिमित्त श्री विशाल गणेशाला ११११११ आंब्यांचा नैवेद्य दाखवून आंब्यांची सजावट करण्यात आली होती.

# श्री विशाल गणेश देवस्थानतर्फे सामाजिक संस्थांना आब्यांचा प्रसाद

### सामाजिक संस्थांना मदतीचा हात देणे हे प्रत्येकाचे कर्तव्य : अशोकराव कानडे



श्री विशाल गणेश मंदिर देवस्थानच्यावतीने अक्षयतृतीये निमित्त भाविकांच्यावतीने देण्यात आलेल्या नैवेद्याचे आंबे आदिवासी शिक्षण संस्था टाकली काझी आणि स्नेहालय संस्था येथील मुलांना हा आंब्यांचा प्रसाद देण्यात आला.

नगर - श्री विशाल गणेशाच्या कृपेने सर्वच उत्सव आता मोठ्या प्रमाणात साजरे होत आहे. दरवर्षीप्रमाणे यंदाही साडेतीन मुहूर्तापैकी एक असलेल्या अक्षय तृतीयेला श्री विशाल गणेश मंदिरात भाविकांनी दिलेल्या आंब्यांच्या प्रसादाचा नैवद्य दाखविण्यात आला होता. मोठया आकर्षक पद्धतीने श्री विशाल गणेशाची आंब्यांची पुजा बांधण्यात आली होती. या आंब्यांचे दान सत्कारणी लावण्याच्या उद्देशाने आदिवासी शिक्षण संस्था टाकली काझी आणि स्नेहालय संस्था येथील मुलांना हा आंब्यांचा प्रसाद देण्यात आला. समाजातील वंचित घटकांसाठी काम करणार्या संस्थेप्रती कृतज्ञता भाव व्यक्त करण्याचा प्रयत्न केला आहे. आज सामाजिक संस्थांना मदतीचा हात देणे हे प्रत्येकाचे कर्तव्य आहे, असे प्रतिपादन श्री विशाल गणेश देवस्थानचे सचिव अशोकराव कानडे यांनी केले.

श्री विशाल गणेश मंदिर देवस्थानच्यावतीने अक्षयतृतीये निमित्त भाविकांच्यावतीने देण्यात आलेल्या नैवेद्याचे आंबे आदिवासी शिक्षण संस्था टाकली काझी आणि स्नेहालय संस्था येथील मुलांना हा आंब्यांचा प्रसाद देण्यात आला. याप्रसंगी पुजारी संगमनाथ महाराज, देवस्थानचे उपाध्यक्ष पंडितराव खरपुडे, सचिव अशोकराव कानडे, विश्वस्त रंगनाथ फुलसौंदर, चंद्रकांत फुलारी, संजय चाफे, प्रा. माणिकराव विधाते, नितीन पुंड, गणेश राऊत आदि उपस्थित होते.

कार्यक्रमाचे सूत्रसंचालन नितीन पुंड यांनी केले. संजय चाफे यांनी आभार मानले

# श्री विशाल गणेशाला ११११११ आंब्यांचा नैवेद्य

नगर - शहराचे ग्रामदैवत श्री विशाल गणेश मंदिरात अक्षय तृतीयानिमित्त श्री विशाल गणेशाला ११११११ आंब्यांचा नैवेद्य दाखवून आंब्यांची सजावट करण्यात आली होती. सकाळी अभिषेक करण्यात आला. दुपारी उद्योजक नरेंद्र फिरोदिया, छाया फिरोदिया, आशा फिरोदिया अनुष्का फिरोदिया, गौरव भंडारी, काव्या फिरोदिया यांच्या हस्ते महापुजा करुन आरती करण्यात आली.

याप्रसंगी पुजारी संगमनाथ महाराज याप्रसंगी देवस्थानचे उपाध्यक्ष पंडितराव खरपुडे, सचिव अशोकराव कानडे, ज्ञानेश्वर रासकर, विजय कोथिंबिरे, प्रा. माणिकराव विधाते, नितीन पुंड, गणेश राऊत आदी उपस्थित होते.

याप्रसंगी पंडितराव खरपुडे म्हणाले, 'अक्षय तृतीया साडेतीन मुहूर्तांपैकी एक आहे. याच दिवशी त्रेता युगाचा प्रारंभ झाला. या दिवशीसत्ययुगाचा प्रारंभ झाली. अशी संधी साधलेली असल्यामुळे अक्षय तृतीया या संपूर्ण दिवसाला 'मुहूर्त' म्हणतात. या दिवसाला साडेतीन मुहूर्तांतील एक मुहूर्त मानले जाते. अक्षय्य तृतीयेच्या दिवशी सात त्याने सुख-समृद्धी प्राप्त करून देणार्या देवतेची कृतज्ञतेचा भाव ठेवून उपासना केल्यास देवतेच्या कृपादृष्टी कायम आपल्यावर राहते. या काळात केलेले दानही सर्वात पवित्र मानले जाते. असेच अक्षयतृतीयानिमित्त आंबा स्वरुपात भाविकांनी दान दिले असल्याचे सांगून भाविकांना दर्शन सुलभ व्हावे, यासाठी सोयी-सुविधा उपलब्ध करुन दिल्या असल्याचे सांगितले.

यावेळी प्रा. माणिकराव विधाते यांनी देवस्थानच्या विविध उपक्रमांची माहिती दिली. दानशूर भाविकांचे आभार मानले. कार्यक्रमाचे सुत्रसंचलन अशोकराव कानडे यांनी केले. ज्ञानेश्वर रासकर यांनी आभार मानले.

यावेळी विजय कोथिंबिरे म्हणाले कि, यासाठी फिरोदिया परिवार आणि गणेश भक्त यांचे सहकार्य लाभले. भाविकांनी दर्शनासाठी गर्दी केली होती.

# हजारों हापूस आंब्यांनी नवी पेठ येथील श्रीराम मंदिरात आकर्षक सजावट



नगर - अक्षय तृतीयानिमित्त नवी पेठ येथील श्रीराम भक्त हनुमान सत्संग मंडळ ट्रस्टच्या वतीने श्रीराम मंदिरात हजारो हापूस आंब्यांची आकर्षक सजावट करण्यात आली. दरवर्षीप्रमाणे यंदाही मंदिर परिसर सुगंधी आणि रंगीबेरंगी आंब्यांच्या सजावटीने नटला असून, या उपक्रमामुळे भाविकांमध्ये विशेष आकर्षण निर्माण झाले. सकाळपासूनच मंदिरात भक्तांची गर्दी उसळली होती. हापूस आंब्यांच्या सुवासाने संपूर्ण परिसर दरवळून गेला होता, तर मंदिरातील देखणे व नयनरम्य सजावट पाहण्यासाठी नागरिकांनी उत्साहाने उपस्थिती लावली. सजावटीमुळे मंदिराचे सौंदर्य अधिक खुलून दिसत होते आणि प्रत्येक भाविक या दैवी वातावरणात हरखून जात होता. या प्रसंगी श्रीरामाची महाआरती भक्तिभावाने झाली. आरतीदरम्यान जय श्रीराम आणि जय हनुमान जयजयकारच्या घोषणांनी परिसर दुमदुमून गेला होता. भाविकांनी श्रद्धेने दर्शन घेत प्रार्थना केल्या आणि अक्षय तृतीयेच्या मुहूर्तावर पुण्यसंचय केला.

ट्रस्टचे अध्यक्ष प्रितम मुथ्था व उपाध्यक्ष निखील शेटिया सांगितले की, मंडळाच्या वतीने वर्षभर विविध धार्मिक उत्सव व सांस्कृतिक उपक्रमांचे आयोजन केले जाते. श्रीराम जन्मोत्सव, हनुमान जन्मोत्सव, गोकुळ अष्टमी, अन्नकूट महोत्सव, देवदिवाळी, प्रतिष्ठा द्वादशी यांसारखे उत्सव उत्साहात साजरे केले जातात. तसेच दर शनिवारी रात्री ८ ते १० या वेळेत संगीतमय श्री हनुमान चालीसा पाठ, भजन संध्या कार्यक्रमास तरुणांचा वाढता प्रतिसाद पाहून ट्रस्ट वतीने येत्या शनिवार पासून बैठक व्यवस्था वाढविण्यात येणार आहे.

अक्षय तृतीया निमित्त करण्यात आलेली ही आंब्यांची सजावट केवळ धार्मिक श्रद्धेचे प्रतीक नसून, सामाजिक एकोप्याचेही दर्शन घडवणारी ठरली. मंदिर परिसरात स्वच्छता, सुंदर रोषणाई आणि शिस्तबद्ध व्यवस्था यामुळे कार्यक्रम अधिक यशस्वी ठरला. ट्रस्ट चे सेवेकरी नी भाविकांना योग्य मार्गदर्शन करत सुरळीत दर्शन व्यवस्था ठेवली. या आगळ्यावेगळ्या उपक्रमामुळे श्रीराम मंदिर नवीपेठ पुन्हा एकदा श्रद्धा, भक्ती आणि सांस्कृतिक परंपरेचे केंद्रबिंदू ठरले असून सर्व नगरवासीयांनी या उपक्रमाचे मनापासून स्वागत केल.

# अहिल्यानगर शहरात २४ एप्रिल रोजी ग्रामीण एआय समिट २०२६ चे आयोजन

नगर - एआय भारताचे भविष्य घडवत आहे. अहिल्यानगर जिल्ह्याची एआय व स्टार्टअप क्षेत्रात देशाच्या नकाशावर ठळकपणे उदयास येण्याची क्षमता आहे, असे प्रतिपादन नितीन उदमले यांनी करत ग्रामीण भागात आधुनिक तंत्रज्ञानाचा प्रसार करण्यासाठी मोठा पुढाकार घेतला आहे. याच पार्श्वभूमीवर अहिल्यानगर येथे ग्रामीण एआय समिट २०२६ चे आयोजन करण्यात आले आहे. ही समिट नितीन उदमले फाउंडेशन यांच्या वतीने आयोजित करण्यात आले असून 'द डेटा टेक लॅब्स, पुणे' हे सह-आयोजक आहेत. २४ एप्रिल रोजी सकाळी ९ ते सायं. ५ या वेळेत माऊली संकुल, सावेडी, अहिल्यानगर येथे हा समिट पार पडणार आहे.

समिटच्या उद्घाटन समारंभामध्ये संग्राम जगताप (आमदार), सोमनाथ घार्गे (जिल्हा पोलीस अधीक्षक, अहिल्यानगर), आनंद भंडारी (मुख्य कार्यकारी अधिकारी, जिल्हा परिषद, अहिल्यानगर), शरद जरे (संचालक, कृषी विपणन, महाराष्ट्र राज्य), डॉ. अमित आंद्रे (संस्थापक-सीईओ, द डेटा टेक लॅब्स, पुणे ), सुधाकर बोराळे (जिल्हा अधीक्षक कृषी अधिकारी), राजेंद्र पाटील (कुलसचिव, महात्मा फुले कृषी विद्यापीठ, राहुरी), विजय मुळीक (अतिरिक्त मुकाअ, जिल्हा परिषद) तसेच वैभव कलुबर्मे (अतिरिक्त पोलीस अधीक्षक) यांचा समावेश आहे.

कार्यक्रमाची सुरुवात सकाळी ९ ते ९:३० या वेळेत नोंदणी व नेटवर्किंग सत्राने होणार असून त्यानंतर ९:३० ते १०:३० या वेळेत उद्घाटन समारंभ पार पडणार आहे. यानंतर विविध तज्ज्ञांच्या मार्गदर्शनाखाली एआय विषयावर सखोल सत्रांचे आयोजन करण्यात आले आहे.

सकाळच्या सत्रात डॉ. अमित आंद्रे हे ग्रामीण एआय: डिजिटल समावेशनातून बुद्धिमान सक्षमीकरणाकडे या विषयावर मार्गदर्शन करणार असून, 'डिजिटल इंडिया' पासून 'इंटेलिजेंट इंडिया' कडे होत असलेल्या प्रवासाची सविस्तर माहिती देणार आहेत.

यानंतर रवींद्र पाल सिंग (संचालक, एएमडीओसीएस, पुणे) हे एआयचा नैतिक वापर, डेटा सुरक्षा आणि जबाबदार तंत्रज्ञान या महत्त्वपूर्ण विषयावर विचार मांडणार आहेत.

तसेच डॉ. आनंद कुलकर्णी हे औद्योगिक क्रांतीतील एआय आणि संधी या विषयावर मार्गदर्शन करणार असून उद्योग क्षेत्रातील एआयचे वाढते महत्त्व अधोरेखित करणार आहेत.

त्यानंतरच्या सत्रात डॉ. स्मिता काळे या ग्रामीण भागातील उद्योजकांसाठी एआयच्या माध्यमातून नवीन व्यवसाय संधी कशा निर्माण होऊ शकतात यावर सखोल मार्गदर्शन करण्यात येणार आहे.

दुपारच्या सत्रात पुन्हा एकदा डॉ. अमित आंद्रे हे फिल्म मेकिंग, जाहिरात आणि सोशल मीडिया मार्केटिंगमध्ये एआय या विषयावर मार्गदर्शन करणार असून कंटेंट क्रिएटर्स आणि इन्फ्लुएन्सर्ससाठी एआयच्या संधी स्पष्ट करणार आहेत.

यानंतर डॉ. निरंजन देशमुख हे आरोग्य क्षेत्रातील एआयच्या वापरावर प्रकाश टाकणार आहेत.

अमित सिंग (संस्थापक - अवतारा डिफेन्स, नवी दिल्ली) हे एआयच्या वापरातून फायदेशीर स्टार्टअप्स व ग्रामीण रोजगार या विषयावर मार्गदर्शन करणार असून ग्रामीण युवकांसाठी नवीन संधींचे दालन उघडणार आहेत.

शेवटच्या सत्रात सचिन पांचाळ (कृषी अधिकारी) हे एआय आणि कृषि या विषयावर मार्गदर्शन करणार असून आधुनिक शेतीत एआयचा वापर कसा उपयुक्त ठरतो याचे उदाहरणांसह विवेचन करणार आहेत.

हा समिट केवळ तांत्रिक चर्चेपुरता मर्यादित नसून ग्रामीण भागातील युवक, शेतकरी, विद्यार्थी आणि उद्योजकांसाठी नव्या संधींचा नवा अध्याय ठरणार आहे. एआयच्या माध्यमातून शेती, आरोग्य, शिक्षण आणि उद्योग क्षेत्रात मोठे परिवर्तन घडवून आणण्याची क्षमता या समिटमुळे निर्माण होणार आहे. ग्रामीण भागातील नागरिकांनी, विशेषतः युवक, शेतकरी व उद्योजकांनी या समिटमध्ये सहभागी होऊन या संधीचा लाभ घ्यावा, असे आवाहन आयोजक नितीन उदमले फाऊंडेशन च्या वतीने केले आहे.

# धम्माल मनोरंजन


## दिनविशेष २४ एप्रिल

१८८९ : सर स्टॅफोर्ड क्रिप्सफ इंग्लिश राजकारणी यांचा जन्म. (मृत्यू: २१ एप्रिल १९५२)
१८९६ : रघुनाथ वामन दिघेफ रसाळ लेखन करणारे कादंबरीकार यांचा जन्म. (मृत्यू: ४ जुलै १९८०)
१९१०: ङ्गराजा परांजपेफ चित्रपट दिग्दर्शक, निर्माते आणि अभिनेते यांचा जन्म. (मृत्यू: ९ फेब्रुवारी १९७९)
१९२९ : राजकुमारफ कन्नड चित्रपट अभिनेता व गायक यांचा जन्म. (मृत्यू: १२ एप्रिल २००६)
१९४२ : जॉर्ज वेलाफ माल्टा देशाचे १०वे अध्यक्ष
१९४२ : ङ्गबार्बारा स्ट्रायसँडफ अमेरिकन अभिनेत्री, गायिका, चित्रपट निर्माती व दिग्दर्शिका यांचा जन्म.
१९७० : ऑस्ट्रेलियन क्रिकेटपटू डॅमियन फ्लेमिंग यांचा जन्म.
१९७१ : कुमार धरमसेनाफ श्रीलंका चे क्रिकेट खेळाडू व पूर्व कप्तान.
१९७३ : भारतीय क्रिकेटपटू सचिन तेंडुलकर यांचा जन्म.१९८७ : वरुण धवनफ अभिनेता यांचा जन्म.
१९९३ : ७३ वि घटनात्मक दुरुस्ती, पंचायत संस्थांना घटनात्मक संरक्षणवरील
मृत्यू :१९४२ : ङ्गदीनानाथ मंगेशकरफ नाट्यसंगीत, गायक आणि अभिनेते यांचे निधन. (जन्म: २९ डिसेंबर १९००)
१९६० : लक्ष्मण बळवंत तथा ङ्गअण्णासाहेब भोपटकरफ नामवंत वकील यांचे निधन.
१९७२ : जामिनी रॉयफ चित्रकार यांचे निधन. (जन्म: ११ एप्रिल १८८७)१९७४ : रामधारी सिंह दिनकरफ देशभक्त तसेच हिंदी साहित्यिक यांचे निधन. (जन्म: २३ सप्टेंबर १९०८)
१९९४ : उद्योगपती, किर्लोस्कर उद्योग समूहाचे आधारस्तंभ शंतनुराव किर्लोस्कर यांचे निधन. (जन्म: २८ मे १९०३)
१९९९ : ङ्गसुधेंदू रॉयफ चित्रपट कला दिग्दर्शक यांचे निधन.२०१४ : भारतीय राजकारणी शोभा नेगी रेड्डी यांचे निधन. (जन्म: १६ नोव्हेंबर १९६८)

## बोधकथा

सुरेशच्या घरी एक पोपट होता. त्याचे नाव चंदन तो पिंजऱ्यात राही. डाळ, मिरची खाई आणि गोड गोड शीटी वाजवी. त्याला खाण्यापिण्याचे सुख होते. पण पिंजऱ्याबाहेर जायचे मात्र नशिबी नव्हते. या गोष्टीचे त्याला फार वाईट वाटायचे. एक दिवस तो सुरेशला म्हणाला– ''सुरेशदादा, मला पिंजऱ्याबाहेर सोडतोस का रे? मी तुझे उपकार जन्मभर विसरणार नाही. मी माझ्या आईबाबांना कितीतरी दिवसात भेटलो नाही.'' सुरेशला आठवले, दोन दिवस त्याचे आईबाबा त्याला शेजारच्या ताराबाईंकडे ठेवून गावाला गेले होते, तर तो कसा अगदी रडकुंडीस आला होता. मग हा तर चिमुकला पोपट? सुरेशला दया आली. त्याने पिंजऱ्याचे दारं उघडले. पोपटाने आकाशात भरारी मारली. त्या दिवशी आईबाबा सुरेशला भारी रागावले. काही दिवसानंतर एकदा संध्याकाळी सुरेश छोटया रमेशाला घेऊन बागेत गेला होता. तिथे त्याने हिरवळी वर रमेशला ठेवले व स्वतःइतर मुलांबरोबर खेळू लागला. थोड्या वेळाने त्याने पाहिले तर रमेश जागेवर नव्हता. सुरेश घाबरला. घसरगुंडीच्या जिन्यावर चढून त्याने बागेत चौफेर पाहिले आणि त्याला रमेश दिसलाही, पण बागेत एका विहिरीचे बांधकाम चालू होते, तेथे तो होता. दोन वर्षाचा रमेश विहिरीच्या काठावर उभा होता. काम करणारे मंजूर संध्याकाळ झाल्यामुळे घरी गेले होते. रमेश थोडा पुढे गेला तर? सुरेश ओरडू लागला, ''रमेश...। रमेश....।'' अन धावू लागला. इतक्यात त्याला दिसले एक पक्षी आकाशातून उडत–उडत आला. त्याच्या तोंडात पिकलेला पेरू होता. तो रमेशच्या मागे टाकला व रमेशला हाक मारली, ''रमेश....।' रमेश एकदम मागे वळला. पाहतो तर पिकलेला पेरू. इतक्यात पक्ष्याने पेरू थोडा दूर फेकला. रमेश दुडदुड धावत पेरूकडे विहिरीपासून दूर गेला.'

## महाशब्दकोडे



### आडवे संकेत

१) रमणीय, सुंदर
४) पचविण्याचे कार्य
८) निर्मळ, शुद्ध
९) नाथ आडनाव असलेला एक सिनेकलाकार.
११) चंचल
१३) अव्वाच्या सव्वा भावात
१५) विचार, शोध
१७) टणक, मजबूत
१८) शीतज्वर
२०) यास नेणे म्हणजे धसास लावणे होय.
२१) एका दिशेचे नाव
२३) शुभलक्षणी
२७) मास विकणारा
२८) सृष्टी, विश्व
२९) इंग्रजी चाबी
३०) जिवापेक्षा जास्त
३२) तेज, चकाकी
३३) पापिष्टांची शिक्षा भोगण्याचे स्थळ
३४) एकांकी राहणारा
३९) पातळ, गोळा
४०) जाणाऱ्या येणाऱ्यांची वरदळ इ. मुळे होणारी झीज
४१) होम हवन, पुजा
४२) मुकाबला, लढत
४३) होडी, नौका
४४) एका हिरोचे नाव
४५) राक्षस
४६) आई
४७) सर्प
४८) शंभर
४९) लाजणे
५०) आश्रयास, रक्षणकर्ता


### उभे संकेत

१) लग्न न झालेला
२) फजिती, हुर्यो
३) राजाची आई
४) धर, सांडस
५) नाकात घालावण्याचा अलंकार
६) याचना करणारा
७) पावसाची सर
१०) स्वराज्य हा माझा जन्मसिद्ध हक्क आहे आणि तो मी मिळविणारच हे ठणकावून सांगणारे
१२) पडशाळा
१४) एक फळ
१६) व्याजासह
१९) शुभ
२२) फांदी, अंग
२४) उलटा जय
२५) भुतकाळ
२६) सत्यानाश करणे, बिघडविणे
३०) वस्तु ठेवण्याचे ठिकाण
३१) दिवस
३४) प्रत्येक पक्षाचा अकरावा दिवस
३५) सीतेचे पुत्र
३६) तीळ परतून, कुटुन व साखर घालून केलेले चुर्ण
३७) द्विदल धान्याचे सुटे कण
३८) अग्निदेवता
४१) मृत्यूदेवता
४२) हळू–हळू ४४) निजणे, शय्या
४५) दटावणे, दाबणे
४६) कंस कृष्णाचा कोण?
४७) दाम दंड भेद

### मागील उत्तर

| | | | | | | | | | | | | |
|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|
| म | धु | क | र | तो | र | ड | म | ल | | भै | र | वी |
| न | म्र | ता | | ल | | हा | र | प | णे | | | ज |
| क | पा | र | | दा | त | की | | क | | स | ह | न |
| व | न | | पा | र | वा | | ठा | णे | दा | र | | |
| डा | | दै | व | | ना | य | क | | ट | पो | र | |
| | अ | व | सा | न | | | ठी | | | त | म | स |
| हि | | वा | ळ | | टो | | क | ल | म | दा | न | |
| ड | | न | | वा | क | स | | का | | र | | हिं |
| गा | था | | द | म | दा | टी | | की | स | | वा | ड |
| | रे | ती | | न | र | प | शू | | र | ण | र | ण |
| क | पा | ळ | | | | | क्र | म | ण | | स | वा |
| स | ल | | द | स | रा | दि | वा | ळी | | | दा | रा |
| ब | ट | वा | | त्य | | स | र | | सु | ता | र | |

## STUDENT CAREER FOR MPSC EXAM



- कोणता पदार्थ आदर्श जळण आहे?– हायड्रोजन.
- विद्युत दीपामध्ये ऑरगॉन बरोबर कोणत्या वायूचा उपयोग करतात? –नायट्रोजनचा.
- तेलापासून मेण बनविण्याच्या क्रियेला काय म्हणतात? –हायड्रोजनेशन.
- अमोनिया वायू प्रथम कोणत्या शास्त्रज्ञाने तयार केला?– प्रिस्टले.
- बेशुद्ध पडलेल्या व्यक्तिला शुद्धीवर आणण्यासाठी कोणत्या वायुचा उपयोग करतात?– अमोनिया.
- एकापेक्षा जास्त पदार्थापासून बनविलेल्या वस्तूला काय म्हणतात? – अॅलॉय.
- खनिज लोखंडापासून शुद्ध लोखंड तयार करताना उत्प्रेरक म्हणून काय वापरतात? – आयोडिन.
- संगमरवराचे रासायनिक नाव काय?– कॅल्शियम कार्बोनेट.
- कोणत्या निष्क्रीय वायूची सर्वात जास्त संयुगे होतात?– हेलियम.
- हवा कोरडी असताना समुद्रसपाटीजवळ हवेतऑक्सिजनचे प्रमाण किती असते?–२१ टक्के.
- गुरांच्या गोठ्यात किंवा मुत्रीघरात कोणत्या वायूचा वास येतो? – अमोनिया.
- हॅलोजन मूलद्रव्यापैकी हायड्रोजन विषयी सर्वात कमी आसक्ती कोण दाखवितो? – आयोडिन.
- बंदुकीच्या गोळ्या तयार करण्यासाठी कोणता धातू वापरतात? – शिसे.
- अंड्याचे पांढरे कवच कशाचे बनलेले असते? – कॅल्शिअम कार्बोनेटचे.
- प्लॅस्टर ऑफ पॅरिस कशापासून बनलेलेअसते?– जिप्सम.
- बॉक्साईट कोणत्या धातूचे कच्चे खनिज आहे?–अॅल्युमिनिअम.
- खनिज खताच्या उत्पादनात कोणता घटक अतिशय उपयुक्त ठरतो? – नायट्रीक अॅसिड.
- खतामध्ये कोणता घटक असतो?–नायट्रोजन,फॉस्फरस, सल्फेट.
- कोणते खत सेंद्रिय खत आहे?– पोटॅश.
- सर्वात जास्त मूलद्रव्ये असलेले आवर्तन कोणते?– सहावे.
- एकाच आवर्तनातील मूलद्रव्यांच्या बाबतीत लागू पडणारा गुणधर्म कोणता? –त्याच्या अणूच्या इलेक्ट्रॉनकक्षांची संख्या समान असते.
- सोने या मूलद्रव्याची संज्ञा काय?– **Au**
- कठीण पाणी मृदू करण्यासाठी कशाचा वापर करतात? – सोडियम कार्बोनेटचा.
- फॉस्फरसचा शोध कोणी लावला?– बँडने.
- पेट्रोलियमच्या शुद्धीकरणासाठी वापरला जाणारा घटक कोणता? – कॉपर ऑक्साईड.
- धुरकट ज्योतीने जळणारा व खूप काळजी तयार करणारा वायू कोणता?– बेन्झीन.
- रेडियम– २२६ या अर्धआयुष्यकाळ किती?– १६०० वर्ष.
- साखर उद्योगात साखरेच्या द्रवणाचे विरंजन करण्यासाठी वापरला जाणारा वायू कोणता? –सल्फरडाय ऑक्साईड.
- निलवायू म्हणून ओळखला जाणारा वायू कोणता?– वॉटर गॅस.
- रॉकेटमध्ये इंधन म्हणून कोणत्या वायूचा वापर करतात?–फ्लोरीन.
- कॉस्टीक सोड्यापासून सोडियम मिळविण्याच्या पद्धतीला कोणत्या नावाने संबोधले जाते? – कासनेरची पद्धत.

## विनोद

गुरुजी– गाय आणि घोडा यांच्यात काय फरक आहे?
एक विद्यार्थी– ''गाय दूध देते, तसा घोडा....''
दुसरा विद्यार्थी–मी सांगू गुरुजी। गाय गाय आपली माता आहे, तर घोडागाडीतून आपण प्रवास करतो.

-----------------------



मुलगा– बाबा
वडील– हां, बोल बेटा।
मुलगा–मराठी आपली मातृभाषा आहे?
वडील– होय बेटा।
मुलगा– मग, तुम्ही मराठी का बोलता?
फक्त आईनेच मराठी बोलले पाहिजे।

## चिंतन


**विदयेविना मती गेली, मतीविना नीती गेली। नीतीविना गती गेली, गतीविना वित्त गेले।।**

**–म. जोतीबा फुले**

वित्ताविना शुद्र खचले, इतके अनर्थ एका अविदयेने केले।। या उक्तीतून विदयेचे महत्त्व जोतिबांना सांगितले आहे. सारा समाज हा उन्नतीच्या क्षितीजाकडे झेपावा असे वाटत असेल तर शिक्षण हा त्याचा पाया असायला हवा हे जोतीबांनी जाणले होते. अस्पृश्य व स्त्रियांनी शिक्षणाची दालने उघडणारा पहिला भारतीय म्हणजे ज्योतीबा फुले.

## फिल्मी शब्दकोडे





### आडवे संकेत

१) सडक चित्रपटात महाराणा कोणत्या नायकाचे नाव होते
६) सन १९९४ मध्ये आलेला सोनाली बेंद्रेचा पहिला चित्रपट.
७) सन २००२ मध्ये आलेला लाल सलाम चित्रपटाचा नायक.
८) सन १९९९ मध्ये इंद्रकुमार दिग्दर्शीत आमीर खान आणि मनिषा कोईरालाचा एक चित्रपट.
९) हिंदुस्थानी (चित्रपट)
१०) इना मिना डिका चित्रपटाची नायीका.
१३) सन १९८३ मध्ये बृज दिग्दर्शीत या चित्रपटात शत्रुघ्न सिन्हा आणि हेमामालिनी होते.
१५) सन १९९५ मध्ये जय प्रकाश दिग्दर्शीत ऋषी कपूर, तब्बु आणि रविना टंडनचा एक चित्रपट.
१९) सन १९८७ मध्ये मेहुल कुमार दिग्दर्शीत या चित्रपटात गोविंदा आणि फराह होते.
२०) सन १९९० मध्ये इंद्रकुमार दिग्दर्शीत आमिर खान आणि माधूरी दीक्षीतचा चित्रपट.
२२) अजय देवगन आणि काजोलचा एक चित्रपट.
२३) सन १९८४ मध्ये के. बापैय्या दिग्दर्शीत राजेश खन्ना आणि श्रीदेवीचा एक चित्रपट.
२६) सन १९७६ मध्ये नरेंद्र बेदी दिग्दर्शीत या चित्रपटात राजेश खन्ना आणि नितू सिंह होते.
२७) कर दी आपने (चित्रपट)
२८) सन १९७३ मध्ये यश चोपडा दिग्दर्शीत या चित्रपटात राजेश खन्ना आणि शर्मिला टैगोर होते.
२९) सन १९९१ मध्ये भरत कपूर दिग्दर्शीत गोविंदा आणि सोनमचा एक चित्रपट.
३०) सन १९९० मध्ये राकेश रोशन दिग्दर्शीत या चित्रपटात अनिल कपूर, माधूरी दीक्षीत आणि शिल्पा शिरोडकर होते.

### उभे संकेत

१) डफलीवाले डफली बजा मेरे घुंगरु.... या गाण्याचा चित्रपट.
२) सन २००१ मध्ये शशीलाल नायर दिग्दर्शीत शाहरुख खान आणि जुही चावलाचा एक चित्रपट.
३) आफताब शिवदासानी आणि उर्मिलाचा एक चित्रपट.
४) सन २००० मध्ये राजकुमार संतोषी दिग्दर्शीत या चित्रपटात अनिल कपूर, माधूरी दीक्षीत आणि नम्रता होते.
५) सन १९९२ मध्ये कै. बापैया दिग्दर्शीत या चित्रपटात ऋषी कपूर आणि निलम होते.
६) सन १९९९ मध्ये या चित्रपटात अक्षय कुमार, माधूरी दीक्षीत आणि सैफ अली खान होते.
७) सन १९९३ मध्ये अजीज सेजावल दिग्दर्शीत या चित्रपटात जैकी श्रॉफ आणि दिव्या भारती होते.
११) ऋषी कपूर, जेबा आणि अश्विनी भावेचा चित्रपट.
१२) सुनील दत्त दिग्दर्शीत या चित्रपटात संजय दत्त, रिना रॉय होते.
१३) बदन (चित्रपट)
१४) सन १९७५ मध्ये यश चोपडा दिग्दर्शीत अमिताभ बच्चन, परविन बॉबी आणि शशी कपूरचा चित्रपट.
१६) सन १९७३ मध्ये आलेला अमिताभ, सीमी ग्रवालचा चित्रपट.
१७) सन १९९८ मध्ये हमीद अली दिग्दर्शीत या चित्रपटात फराज खान आणि रानी मुखर्जी होते.
१८) और अप्सरा (चित्रपट)
१९) सन १९९१ मध्ये आलेला डिम्पल कपाडिया, धर्मेंद्रचा चित्रपट.
२१) सन १९७२ मध्ये रामानंद सागर दिग्दर्शीत राजेंद्रकुमार, माला सिन्हाचा एक चित्रपट.
२४) नंबरी (चित्रपट)
२५) सन १९८२ मध्ये देव आनंद दिग्दर्शीत या चित्रपटात जैकी श्रॉफ होता.
२६) या चित्रपटात अमिताभ बच्चनचा ट्रिपल रोल होता.

### मागील फिल्मी उत्तर

| | | | | | | | | | | | | |
|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|
| हि | मे | श | रे | श | मी | या | | | | जो | रु | |
| रो | | | | | | | अ | व | ता | र | | म |
| हिं | दु | स्ता | न | कि | क | स | म | | ल | | | वा |
| दु | | | म | | र्ज | | र | ति | | च | मे | ली |
| स्था | | ह | क | | | खे | | | | र | | |
| नी | ल | | ह | म | दि | ल | दे | चु | के | स | न | म |
| | | | ला | | ल | | व | | | | | द |
| सं | ग | दी | ल | | तो | | दा | ग | द | फ्र | य | र |
| गी | | | | | पा | र | स | | ह | | | |
| त | वा | य | फ | | ग | | | म | क | स | द | |
| | | | | मि | ल | न | | हा | | | ला | |
| व | क्त | ह | मा | रा | है | | | रा | | स | ल | मा |
| | | | | का | | रा | जा | जा | नी | | | |

## चारोळी

बाळा तुझ्या चाहुलीनं
स्त्रीत्व मला प्राप्त झालं
आणि तुझ्या आगमनानं
पूर्णत्व विवाहाला आलं

## पाक कला

### पनीरचे पराठे

साहित्य : कणीक– दोन पेले, पनीरचा किसून व नंतर बोटांनी मळून केलेला चुरा– पाऊण पेला, भाजून केलेली जिरे पूड– अर्धा टी स्पून, ओवा–पाव टी स्पून, आमचूर पूड–एक टीस्पून, मीठ तुपाचे मोहन– एक टी स्पून, तिखट–एक टी स्पून, धने पूड–एक टीस्पून, तूप

कृती : तळणीचे तूप वगळून कणकेत चवीनुसार मीठ व तुपाचे मोहन घालून, कणीक घट्ट मळा, झाकून बाजूला ठेवा. एका ताटलीत पनीरचा चुरा, मीठ, सर्व मसाले घाला. हवे तर तुपाचा हात लावून एकजिनसी मळून घ्या. मळलेल्या कणकेचे मध्यम उंडे करा व पुरणपोळीसाठी ज्याप्रमाणे पुरणाचे सारण भरतो, तसे पनीरचे सारण भरा. तापलेल्या तव्यावर, दोन्हीं बाजूंनी तूप सोडून पराठे खमंग भाजा.

# राहुरी पोटनिवडणुकीसाठी दुपारी ३ वाजेपर्यंत ४० टक्के मतदान

## ७ उमेदवारांचे राजकीय नशिब ईव्हीएममध्ये बंद; ४ मे रोजी मतमोजणी



राहुरी – राहुरी विधानसभा पोटनिवडणुकीसाठी २३ एप्रिल रोजी अत्यंत शांततेत मतदान प्रक्रिया पार पडली. सकाळी ७ वाजता मतदानाला सुरुवात झाली असून, दुपारी ३ वाजेपर्यंत मतदारसंघात ३९.६५ टक्के मतदानाची नोंद झाली आहे. सकाळच्या सत्रात मतदारांचा प्रतिसाद चांगला राहिला. मात्र, दुपारी उन्हाचा कडाका वाढल्यामुळे पुन्हा मतदानाची गती मंदावली. सायंकाळी मतदानाचा वेग वाढण्याची शक्यता आहे.

राहुरी पोटनिवडणुकीत ७ उमेदवार उभे असून, २३ एप्रिल रोजी मतदान झाल्यानंतर सर्व ईव्हीएम मशिन राहुरी येथील कक्षात कडक बंदोबस्तात ठेवण्यात येतील आणि ४ मे रोजी मतमोजणी होऊन निकाल घोषित केला जाईल, असे प्रशासनाच्यावतीने सांगण्यात आले.

स्व. आमदार शिवाजीराव कर्डिले यांच्या निधनामुळे रिक्त झालेल्या जागेवर ही पोटनिवडणूक होत आहे. या पोटनिवडणुकीत एकूण ३ लाख ३३ हजार ५४५ मतदार असून, ७ उमेदवार निवडणुकीच्या आखाड्यात उतरले आहेत. त्यात स्व. कर्डिले यांचे सुपूत्र अक्षय कर्डिले हे भाजपकडून उमेदवारी करीत आहेत. तर राष्ट्रवादी शरदचंद्र पवार पक्षाकडून गोविंद मोकाटे, वंचित बहुजन आघाडीकडून संतोष चोळके यांच्यासह ४ अपक्ष उमेदवार राहुरी मतदारसंघात आपले नशिब आजमावित आहेत. दरम्यान २३ एप्रिल रोजी सकाळी मतदानाला सुरुवात होताच भाजपाचे उमेदवार अक्षय कर्डिले यांनी त्यांच्या बुऱ्हाणनगर येथे तर राष्ट्रवादी शरदचंद्र पवार पक्षाचे उमेदवार गोविंद मोकाटे यांनी जेऊर येथे मतदान केले. वंचित बहुजन आघाडीचे उमेदवार संतोष चोळके यांचे मतदान देवळाली प्रवरा येथे असून, देवळाली प्रवरा हा गट श्रीरामपूर विधानसभा मतदारसंघाला जोडलेला आहे. त्यामुळे चोळके हे उमेदवार आहेत. मात्र, त्यांचे मतदान श्रीरामपूर मतदारसंघात असल्यामुळे राहुरी पोटनिवडणुकीत त्यांना स्वतःला मतदान करता आले नाही.

राहुरी शहर आणि तालुका तसेच पाथर्डी आणि नगर तालुक्यातील गावांमध्ये सकाळी ७ वाजता मतदान केंद्रांची दारे उघडली. मतदानास अतिशय संथ गतीने सुरुवात झाली. सकाळी ७ वाजेपासून ते ९ वाजेपर्यंत अवघे ६.४२ टक्के मतदान झाले. त्यानंतर मतदानाचा वेग वाढून सकाळी ११ वाजेपर्यंत १८.२२ टक्के मतदान झाले. दुपारी उन्हाचा कडाका वाढल्यानंतर पुन्हा मतदानाचा वेग मंदावला. दुपारी १ वाजेपर्यंत २९.६० टक्के मतदान झाले. त्यानंतर तीन वाजेपर्यंत हा आकडा काहीसा वाढून ३९.६५ टक्केपर्यंत पोहोचला. या निवडणुकीत मतदारांमध्ये फारसा उत्साह दिसून आला नाही.

मतदारसंघात कुठेही अनुचित प्रकार घडल्याचे वृत्त नसून, कडक पोलीस बंदोबस्तात शांततेत मतदान प्रक्रिया सुरू आहे. उर्वरित वेळेत मतदानाचा टक्का आणखी वाढण्याची शक्यता वर्तवण्यात येत आहे.

### टप्प्याटप्प्याने झालेले मतदान

| वेळ | एकूण मतदान | टक्केवारी |
|---|---|---|
| सकाळी ९ पर्यंत | २१४०४ | ६.४२ % |
| सकाळी ११ पर्यंत | ६०७८४ | १८.२२ % |
| दुपारी १ पर्यंत | ९८७४० | २९.६० % |
| दुपारी ३ पर्यंत | १३२२५५ | ३९.६५ % |

### दिव्यांगांना विशेष सुविधा

मतदान केंद्रांवर दिव्यांग मतदारांसाठी विशेष सुविधा निर्माण करण्यात आल्या आहेत. मतदान केंद्रांपर्यंत दिव्यांगांना नेण्यासाठी व्हीलचेअर, एक मदतनीस उपलब्ध करुन देण्यात आला आहे.

### मतदानकेंद्रांवर ऑनलाईन नजर

एकूण ३७४ मतदान केंद्रांवर ही मतदानाची प्रक्रिया पार पडत आहे. प्रशासनाने सर्व मतदान केंद्र वेबकास्टींगद्वारे जोडलेले असून, सर्व मतदान केंद्रांवर काय घडत आहे, हे कन्ट्रोल रुममध्ये ऑनलाईन पद्धतीने दिसत आहे.

# अक्षय कर्डिले यांनी बजावला मतदानाचा हक्क



राहुरी विधानसभेच्या पोटनिवुडणकीनिमित्त बुऱ्हाणनगर येथे मतदानाचा हक्क बजावताना भाजपाचे उमेदवार अक्षय कर्डिले.

नगर – राहुरी-पाथर्डी-नगर विधानसभा पोटनिवडणुकीत मतदान प्रक्रियेला सुरुवात होताच भाजप महायुतीचे उमेदवार अक्षय कर्डिले यांनी बुऱ्हाणनगर येथे मतदानाचा हक्क बजावला. यावेळी त्यांनी स्वर्गीय आमदार शिवाजीराव कर्डिले यांच्या स्मृतींना अभिवादन करत मतदान केले.

मतदानानंतर अक्षय कर्डिले म्हणाले, माझे वडील स्वर्गीय शिवाजीराव कर्डिले यांनी गेली तीस वर्षे जनतेच्या सुख-दुःखात सहभागी होत विकासाच्या योजना यशस्वीपणे राबवल्या. त्यामुळे जनतेचा त्यांच्यावर प्रचंड विश्वास होता. ही पोटनिवडणूक आता जनतेने हाती घेतली आहे.

दरम्यान बुऱ्हाणनगरसह कापूरवाडी, नागरदेवळे परिसरात मतदारांमध्ये मोठा उत्साह दिसून आला. महिलांपासून युवकांपर्यंत सर्वच घटकांनी मतदानात सहभाग नोंदवला. अनेक ठिकाणी सकाळपासूनच मतदान केंद्रांवर रांगा लागल्याचे चित्र पाहायला मिळाले.

# संत निरंकारी मिशनच्यावतीने नगरमध्ये २४ एप्रिल रोजी रक्तदान शिबिर व मानव एकता दिवस सत्संगचे आयोजन

नगर – सद्गुरु माता सुदिक्षाजी महाराज व निरंकारी राजपिताजी यांच्या आशीर्वादाने संत निरंकारी मिशनच्या अहिल्यानगर शाखेच्या वतीने युगप्रवर्तक बाबा गुरबचनसिंहजी महाराज यांच्या ४६ व्या स्मृति दिनानिमित्त 'मानव एकता दिवस' चे आयोजन करण्यात आले असून २४ एप्रिल रोजी मिस्किन रोड स्थित संत निरंकारी सत्संग भवन येथे सकाळी ९ ते दुपारी ४ वाजेपर्यंत जिल्हास्तरीय रक्तदान शिबिराचे आयोजन केले आहे. तसेच रक्तदान विषयी जनजागृती व नागरिकांना माहिती व्हावी म्हणून गुरुवारी सायंकाळी निरंकारी सेवादल च्या वतीने दुचाकी वाहन रॅली शहरात व सावेडी परिसरात काढण्यात येणार आहे.

तसेच मानव एकता दिवस निमित्त विठ्ठल खाडे (सोनई) यांच्या प्रमुख उपस्थितीत सत्संग कार्यक्रम १० ते १२ या वेळेत भवनच्या प्रांगणात होईल, हा पावन दिवस बाबा गुरबचन सिंहजी व चाचा प्रताप सिंहजी यांच्या दिव्य स्मृतीला समर्पित असून त्यांचे संपूर्ण जीवन मानव एकतेसाठी त्याग, समर्पण आणि निःस्वार्थ सेवेचे एक अद्वितीय उदाहरण राहिले आहे, त्यांनी आपल्या आचरणातून आणि विचारांद्वारे मानव जातीला प्रेरणा दिली की खरी साधना केवळ शब्दात नसून निःस्वार्थ सेवा, करुणा आणि परस्पर बंधुभावामध्ये सामावलेली आहे.

शिबिरा विषयी माहिती देताना मंडळाचे नगर झोन प्रमुख हरीष खुबचंदानी यांनी सांगितले की, गेली २९ वर्षापासून नगर शाखेत रक्तदान शिबिर आयोजित केले जात असून मोठ्या श्रद्धेने व उत्साहात येथे भाविक येऊन रक्तदान करतात यात महिलांची संख्याही लक्षणीय असते. त्यांनी पुढे सांगितले की, संत निरंकारी मिशनची सामाजिक शाखा, संत निरंकारी चॅरिटेबल फाउंडेशन च्या विद्यमाने त्या दिवशी देश विदेशात दोनशे हून अधिक ठिकाणी रक्तदान शिबिराचे आयोजन केले जाणार असून पुढे वर्षभर रक्तदान शिबिरांच्या अविरत श्रृंखलांद्वारे ५२० हून अधिक शिबिरांचे आयोजन केले जाणार असून या शिबिरांमध्ये हजारो श्रद्धाळू निःस्वार्थ भावनेने रक्तदान करून मानवजातीच्या रक्षणासाठी आपले अमूल्य योगदान देतील त्याद्वारे त्यांच्या मनात आत्मिक समाधान, शांती आणि कृतार्थतेची भावना निर्माण होते. खुबचंदानी यांनी शेवटी सांगितले की संत निरंकारी मिशन गेल्या चार दशकापासून रक्तदान क्षेत्रात अग्रणी राहिले आहे जिथे सातत्याने रक्तदान शिबिरांचे यशस्वी आयोजन करीत असून ज्याद्वारे असंख्य जीवांना नवा आधार आणि जीवनदान मिळाले आहे.

शिबिरात येऊन रक्तदान करण्याचे आवाहन समस्त नगरवासीयांना निरंकारी मंडळाच्या वतीने करण्यात आले असून सत्संग प्रवचन कार्यक्रमाचाही भाविकांनी लाभ घ्यावा.

# डॉ. बाबासाहेब आंबेडकर 'पुतळा वाद' सहमतीने सुटणार

## अफवांवर विश्वास न ठेवता शांतता राखावी, शिष्टमंडळाची पोलीस अधीक्षक सोमनाथ घार्गे यांच्या उपस्थितीत बैठक



डॉ. बाबासाहेब आंबेडकर पुतळा वाद सोडविण्यासाठीच्या बैठकीत पोलिस अधीक्षक सोमनाथ घार्गे यांच्यासह ग्रामस्थ.

नगर – नेवासा येथील तेलकुड गावातील डॉ. बाबासाहेब आंबेडकर पुतळ्याच्या जागेवरून निर्माण झालेला वाद लवकरच सर्वांच्या सहमतीने सोडवण्यात येईल आणि गावातील शांतता अबाधित राखली जाईल, अशी ग्वाही पोलिस अधीक्षक सोमनाथ घार्गे यांनी दिली.

बहुजन चळवळीचे ज्येष्ठ नेते अशोक गायकवाड यांच्या नेतृत्वाखालील शिष्टमंडळाने प्रशासनाची भेट घेतली असता त्यांनी हे आश्वासन दिले. यावेळी गावातील कार्यकर्ते व ग्रामस्थ उपस्थित होते.

यावेळी बोलताना अशोक गायकवाड यांनी सांगितले की, तेलकुडगाव हे सर्वधर्म समभाव जपणारे गाव असून येथे यापूर्वी कधीही जातीय संघर्ष झाला नाही. मात्र काही विघ्नसंतोषी समाजकंटकांकडून जाणूनबुजून वाद निर्माण करण्याचा प्रयत्न केला जात आहे. सध्या डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांचा पुतळा प्रशासनाच्या ताब्यात असून जागेचा प्रश्न मार्गी लागल्यानंतर पुतळ्याचे अनावरण लवकरच करण्यात येणार आहे. याबाबत पोलिस अधीक्षक घार्गे हे जिल्हा परिषद मुख्य कार्यकारी अधिकारी यांच्याशीही संपर्कात आहेत. तसेच जिल्हाधिकारी डॉ. पंकज आशिया यांनीही या प्रकरणात लक्ष घातले आहे.

या शिष्टमंडळात सुशील धायजे, दयानंद खिलारे, आरपीआय युवक अध्यक्ष अमित काळे, प्रा. भीमराव पगारे, पावलस गोरडे, संजय बनसोडे, यदुभाऊ सोनवणे, श्रीकांत हिवाळे, बाबा आल्हाट, पोपट सरोदे, गणपत मोरे, संदीप क्षीरसागर, स्वप्नील गोरडे, अशोक मिसाळ, रवी कांबळे, हरिश्चंद्र साळवे, संजय साळवे, राजेंद्र तेलधूने, सोपान तेलधूने, दीपक साळवे आदींसह अनेक कार्यकर्त्यांचा सहभाग होता.

गावात शांतता आणि ऐक्य टिकवून ठेवत प्रशासनाच्या मदतीने हा वाद सकारात्मक मार्गाने सोडवला जाईल, असा विश्वास यावेळी व्यक्त करण्यात आला व गावातील व्यक्तींनी कोणत्याही अफवांवर विश्वास न ठेवता शांतता राखावी असे देखील आव्हान करण्यात आले आहे.

# कमी लिंग गुणोत्तर असलेल्या गावांवर लक्ष केंद्रित करा

## जिल्हाधिकारी डॉ.पंकज आशिया



नगर – जिल्ह्यातील ज्या गावांमध्ये लिंग गुणोत्तर कमी आहे अशा प्रत्येक तालुक्यातील १५ गावांची निवड करून त्या गावांवर विशेष लक्ष केंद्रित करावे, तसेच जिल्हा परिषद शाळांमध्ये १५ दिवसांपेक्षा अधिक काळ गैरहजर असणाऱ्या मुलींची माहिती नियमितपणे सादर करावी, अशा सूचना जिल्हाधिकारी डॉ. पंकज आशिया यांनी दिल्या.

महिला व बालविकास विभागामार्फत राबविण्यात येणाऱ्या विविध योजनांचा आढावा बैठकीत ते बोलत होते. बैठकीस महानगरपालिकेचे आयुक्त यशवंत डांगे, जिल्हा महिला व बालविकास अधिकारी संजय कदम, परिविक्षा अधिकारी योगिराज जाधव व संबंधित विभागांचे अधिकारी उपस्थित होते.

डॉ.आशिया म्हणाले, गत तीन महिन्यांत विभागाने ४८ बालविवाह रोखण्यात मिळवलेले यश उल्लेखनीय आहे. यापुढेही या कामात अधिक दक्षता घ्यावी.बालविवाह प्रतिबंधासाठी प्रभावी समन्वय व सातत्यपूर्ण पाठपुरावा आवश्यक आहे.

मिशन वात्सल्य योजनेअंतर्गत तालुकास्तरावर नियमित बैठका आयोजित करण्याबाबत दक्षता घ्यावी, योजनेची अंमलबजावणी प्रभावी होण्यासाठी सर्व संबंधित यंत्रणांनी समन्वयाने काम करावे, असे त्यांनी सांगितले.

महिला हेल्पलाईन क्रमांक १८१ व बालकांसाठी १०९८ या टोलमुक्त क्रमांकाची व्यापक जनजागृती करण्याच्या सूचना त्यांनी दिल्या. कामाच्या ठिकाणी महिलांच्या लैंगिक छळ प्रतिबंध व निवारण कायद्यांतर्गत सर्व कार्यालयांमध्ये अंतर्गत समित्या स्थापन करणे बंधनकारक असल्याचे त्यांनी अधोरेखित केले.

बेटी बचाओ बेटी पढ़ाओ योजनेची प्रभावी अंमलबजावणी करून मुलींचे शिक्षण व सक्षमीकरण यावर भर द्यावा, असे जिल्हाधिकारी डॉ. आशिया यांनी सांगितले. बैठकीत जिल्हा महिला व बालविकास अधिकारी संजय कदम यांनी विभागाच्या कामकाजाचा आढावा सादरीकरणाद्वारे मांडला.

# मोबाईल शॉपी चालकावर चाकू व बंदुकीने प्राणघातक हल्ला

## बालिकाश्रम रोडवरील घटना, दोघांच्या विरुद्ध गुन्हा दाखल

नगर – किरकोळ वादातून एका तरुणाने आपल्या साथीदारासह मोबाईल शॉपी चालकावर प्राणघातक हल्ला केल्याची घटना २१ एप्रिल रोजी रात्री ९.३० च्या सुमारास बालिकाश्रम रस्त्यावर घडली. या हल्ल्यात आरोपीने फिर्यादीच्या हातावर चाकूने वार करून जखमी केले असून, बंदुकीचा धाक दाखवून संपूर्ण कुटुंबाला संपवून टाकण्याची धमकी दिली आहे. याप्रकरणी तोफखाना पोलीस ठाण्यात गुन्हा दाखल करण्यात आला आहे.

याबाबत अक्षय मच्छिंद्र आगरकर (वय ३१, रा. आगरकर मळा, स्टेशन रोड) यांनी फिर्याद दिली आहे. फिर्यादी यांची बालिकाश्रम रोडवर शिवम कम्युनिकेशन नावाची मोबाईल शॉपी आहे. २१ एप्रिल रोजी रात्री ते शॉपी मध्ये असताना आरोपी अनिल लक्ष्मण गायकवाड (रा. बोल्हेगाव) हा एका अनोळखी मुलासह फिर्यादीच्या दुकानावर आला. वादातून आरोपीने अक्षय यांना शिवीगाळ करण्यास सुरुवात केली.

वादाचे रूपांतर हाणामारीत झाले असता, आरोपीने अक्षय यांच्या हातातील मोबाईल हिसकावून तो जोराने जमिनीवर फेकून फोडला. त्यानंतर जवळ असलेल्या चाकूने त्यांच्या डाव्या हाताच्या मनगटावर वार करून दुखापत केली. इतक्यावरच न थांबता, आरोपीने बंदूक काढून तिच्या पाठीमागच्या भागाने अक्षय यांच्या मानेवर मारहाण केली. माझ्या नादी लागला तर तुला आणि तुझ्या खानदानाला गोळ्या घालून मारून टाकीन, अशी धमकी देत आरोपीने फिर्यादीच्या चुलत्यांनाही संपवण्याची भाषा केली. या घटनेमुळे परिसरात दहशतीचे वातावरण निर्माण झाले आहे. पोलीस निरीक्षक जगदीश भोंवळ यांच्या मार्गदर्शनाखाली पोलीस या प्रकरणाचा अधिक तपास करत आहेत.

# मालमत्ता नोंदणीतून महापालिकेला वर्षभरात सव्वापाच कोटींचा महसूल

## ३४२० मालमत्ताधारकांनी १ टक्का शुल्क भरून केली नोंदणी : आयुक्त यशवंत डांगे यांची माहिती

नगर – महापालिका हद्दीत मालमत्ता खरेदी केल्यानंतर तिची महसूल दरबारी नोंद झाल्यानंतर त्या मालमत्तेच्या एकूण खरेदी रकमेच्या १ टक्का शुल्क भरून महापालिकेत नोंदणी करावी लागते. सन २०२५-२०२६ या आर्थिक वर्षात शहरातील ३ हजार ४२० मालमत्ताधारकांनी महापालिकेच्या मालमत्ता नोंदणी विभागाकडे शुल्क भरून मालमत्ता नोंदनी केली असून या माध्यमातून महापालिकेला ५ कोटी २६ लाख रुपयांचे उत्पन्न मिळाले असल्याचे महापालिका आयुक्त यशवंत डांगे यांनी सांगितले.

शहरात दरवर्षी मालमत्तांची मोठ्या प्रमाणात खरेदी-नोंदणी होते. काही मालमत्ताधारक मात्र, मालमत्ता खरेदी केल्यानंतर महापलिकेकडे नोंदणी करत नाहीत. त्यामुळे जुन्याच्या मालकाच्या नावाने घरपट्टी, पाणीपट्टीची बिले कार्यन्वित होतात. मालमत्ता नोंदणी न केल्यास पुढे कायदेशीर बाबीही उद्भवू शकतात. त्यामुळे नव्याने मालमत्ता खरेदी, वारस नोंदणी, बक्षीस पत्र, मृत्यूपत्र आदींची महापालिकेच्या मालमत्ता विभाकडे नोंदणी आवश्यक आहे. याची नागरिकांनी दखल घ्यावी, असे आयुक्त डांगे यांनी सांगितले.

महापालिकेच्या जुने कार्यालयात मालमत्ता नोंदणी विभाग असून करमूल्य निर्धारण विभागाच्या अतर्गत हा कक्ष येतो. तेथे लिपिक अजय गाडे मालमत्ता नोंदणी हस्तांतरणाची प्रक्रिया करतात. मालमत्ता नोंदणीसंदर्भात काही अडचण असल्यास सहाय्यक आयुक्त, अशोक साबळे, करमूल्य निर्धारण अधिकारी विनायक जोशी लिपिक गाडे यांच्याशी नागरिक चौकशी करू शकतात.

### जुन्या मालमत्तांचे नव्याने व्हॅल्युएशन करून नोंदणी

शहरात बहुतांशी मालमत्ताधारकांनी पाच, दहा ते २० वर्षांपूर्वी मालमत्ता खरेदी केलेल्या आहेत. आता पुढील प्रशासकीय तसेच कायदेशीर प्रक्रियेसाठी त्यांना महापालिकेकडे मालमत्ता नोंदणी करणे आवश्यक आहे. अशा मालमत्ताधारकांचे नव्याने व्हॅल्युएशन करून त्यावर १ टक्का शुल्क आकरून नोंदणी करून घेतली जात असल्याचे आयुक्त यशवंत डांगे यांनी सांगितले.

### सॉफ्टवेअर एकत्रिकरणातून मालमत्ता नोंदणी सुलभ होणार

मालमत्ता खरेदीनंतर महापालिकेतील नोंदणी प्रक्रिया आता अधिक सुलभ होणार आहे. महापालिका प्रशासन दुय्यम निबंधक कार्यालयाशी सॉफ्टवेअर एकत्रिकरण करून ही यंत्रणा कार्यान्वित करणार असून, मालमत्ता खरेदीची नोंद होताच त्याची माहिती थेट महापालिकेच्या मालमत्ता नोंदणी विभागाकडे पोहोचणार आहे. त्यामुळे शहरात झालेल्या मालमत्ता खरेदी-विक्री व हस्तांतरणाची अद्ययावत माहिती महापालिकेकडे उपलब्ध राहणार आहे. तसेच खरेदीनंतर नोंदणीस विलंब करणाऱ्या मालमत्ता धारकांना नोटीस बजावून नोंदणी प्रक्रिया पूर्ण करण्यास भाग पाडले जाणार असल्याने महसूल गळतीलाही आळा बसणार असल्याचे आयुक्त यशवंत डांगे यांनी सांगितले.


**महाराष्ट्र शासन**
**कार्यकारी अभियंता,**
**कुकडी पाटबंधारे विभाग क्र.२,श्रीगोंदा**
**ता.श्रीगोंदा,जि.अहिल्यानगर, पिन-४१३७०१ यांचे कार्यालय**
दुरध्वनी क्रमांक -०२४८७/२२२३५१, ई-मेल : kid2_shrigonda@yahoo.co.in

**ई-निविदा सूचना क्र.०१ सन २०२६-२०२७**

महाराष्ट्र राज्याच्या राज्यपालांच्या वतीने कार्यकारी अभियंता कुकडी पाटबंधारे विभाग क्र.२, श्रीगोंदा, जलसंपदा विभाग, महाराष्ट्र शासन हे सक्षम निविदाकारांकडून खालील कामाकरीता ई-निविदाप्रणालीद्वारे (ऑनलाइन) निविदा मागवित आहेत. निविदा कागदपत्रे शासनाचे संकेत स्थळ https://mahatenders.gov.in येथून डाऊनलोड करण्यात यावीत. सविस्तर निविदा सूचना व ई-निविदे बाबत सर्व माहिती शासनाच्या संकेत स्थळावर व विभागीय कार्यालयाच्या सूचना फलकावर उपलब्ध आहे. निविदा स्वीकारण्याचा अथवा नाकारण्याचा अधिकार कार्यकारी अभियंता, कुकडी पाटबंधारे विभाग क्र.२, श्रीगोंदा यांनी राखून ठेवला आहे. अट असलेली निविदा स्वीकारली जाणार नाही. सदर निविदा सूचनेमध्ये काही बदल होत असल्यास https://mahatenders.gov.in या संकेतस्थळावर कळविण्यात येईल.

| अ.क्र. | कामाचे नांव | निविदेची किंमत रुपये |
|---|---|---|
| १ | केंद्रीय धरण सुरक्षा पुनरावलोकन समितीच्या शिफारशींनुसार, मुसळधार पुरामुळे नुकसान झालेल्या ल.पा. तलाव मोहरी, तालुका जामखेड, जिल्हा अहिल्यानगर च्या घटकांची दुरुस्ती करणे. | रू. ३०२.५२ लक्ष |

**जिल्हा :** अहिल्यानगर
**ई-निविदा उपलब्ध कालावधी :** दिनांक : २३/०४/२०२६ ते ३०/०४/२०२६
**ई-निविदा उघडण्याचा दिनांक :** दिनांक : ०४/०५/२०२६

जा.क्र.कुपावि-२/लेशा/निविदा/ १९८६ /२०२६
कार्यकारी अभियंता, कुकडी पाटबंधारे विभाग क्र.२, श्रीगोंदा.
ता.श्रीगोंदा, जि.अहिल्यानगर दि. २०/०४/२०२६

**प्रविण व. घोरपडे**
कार्यकारी अभियंता,
कुकडी पाटबंधारे विभाग क्र. २, श्रीगोंदा, जि.अहिल्यानगर


# पाण्याच्या टाकीवर चढून 'शोले स्टाईल' आंदोलन



नगर – नगर तालुक्यातील भातोडी पारगाव येथे केंद्र सरकारची महत्त्वाकांक्षी जल जीवन मिशन योजना प्रत्यक्षात अपयशी ठरत असल्याचे गंभीर वास्तव समोर आले आहे. गावातील नळ कोरडे, पाण्याच्या टाक्या रिकाम्या आणि नागरिक पाण्यासाठी त्रस्त अशी परिस्थिती निर्माण झाली आहे. या पार्श्वभूमीवर संतप्त ग्रामस्थांनी पाण्याच्या टाकीवर चढून 'शोले स्टाईल' आंदोलन करत प्रशासनाविरोधात निषेध व्यक्त केला.

गेल्या दोन वर्षांपासून गावात नियमित पाणीपुरवठा सुरू व्हावा यासाठी सरपंच विक्रम गायकवाड यांनी गावकऱ्यांसह सातत्याने प्रशासनाकडे पाठपुरावा केला. सुमारे दोन कोटी रुपयांचा निधी मंजूर होऊनही योजना अद्याप अपूर्णच असल्याने ग्रामस्थांमध्ये तीव्र नाराजी पसरली आहे.

आज आंदोलनादरम्यान ग्रामस्थांनी घोषणाबाजी करत जल जीवन मिशन योजनेचा निषेध नोंदवला व तात्काळ काम पूर्ण करून पाणीपुरवठा सुरू करण्याची मागणी केली. अन्यथा तीव्र आंदोलन छेडण्याचा इशारा देण्यात आला.

यावेळी प्रकाश पोटे यांच्या नेतृत्वाखाली आंदोलन पार पडले. त्यांनी प्रशासनाला स्पष्ट इशारा देत सांगितले की, आठ दिवसांच्या आत पाणीपुरवठा सुरू झाला नाही तर जिल्हा परिषद कार्यालयाला टाळे ठोकण्यात येईल.तसेच सरपंच विक्रम गायकवाड यांनीही कठोर भूमिका घेत, लवकरात लवकर योजना पूर्ण झाली नाही तर टोकाचा निर्णय घ्यावा लागेल, असा इशारा दिला. हर घर जल या योजनेचा उद्देश प्रत्येक घरापर्यंत नळाद्वारे पाणी पोहोचवणे हा असला, तरी भातोडी पारगावमध्ये महिलांना आजही पाण्यासाठी भटकंती करावी लागत आहे. त्यामुळे ही योजना केवळ कागदावरच असल्याचा आरोप ग्रामस्थांनी केला आहे.

ग्रामस्थांनी प्रशासनाला अंतिम आठ दिवसांची मुदत दिली असून, या कालावधीत ठोस कारवाई न झाल्यास तीव्र आंदोलन छेडण्याचा इशारा देण्यात आला आहे. या वेळी सरपंच विक्रम गायकवाड, उपसरपंच राजू पटेल, ग्रामपंचायत सदस्य सुभाष कचरे, कैलास गांगर्डे, जालिंदर लबडे, गोविंद लबडे, सिराज पटेल, माजी सरपंच विक्रम लबडे, अजिनाथ शिंदे, सभापती संदीप गुंड, घनश्याम लबडे, फैरोज पटेल, अशोक तरटे, अमोल कदम, निसार शेख, जमीर शेख, जाफर मुलानी, विठ्ठल कुचे, इरफान पटेल, मियाज शेख आदींसह ग्रामस्थ उपस्थित होते.

